संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 5 | Marathi Monthly | Thane, 1 November 2025 to 30 October 2025 | Pages 16 | Price : 10/-

## ‘नटसम्राट’मधील गणपतराव बेलवलकरांसारखी, कुणी घर देता का घर, अशी ‘घरघर’ लागलेली मराठी माणसाची अवस्था! ...राजन राजे

**मराठी माणसाच्या अस्तित्वाचा प्रश्न फक्त, मुंबई आणि उपनगरांपुरता नाहीये; तर, मुंबईसह ठाणे, नाशिक, रायगड, पुणे, नागपूर या सगळ्या शहरांमधून तुम्ही-आम्ही सगळेजण विस्थापित झालेलो आहोत किंवा हळूहळू होत आहोत. करोना-काळात वन्यप्राण्यांनी जशा आपापल्या जागा माणसांकडून पुन्हा ताब्यात घेतल्या होत्या; तशा, आता महाराष्ट्रातल्या सामान्य मराठी-माणसांच्या ताब्यात देण्यासाठी, धनदांडग्यांकडून ‘जागा रिकाम्या’ करुन घ्याव्या लागतील!**

वि. वा. शिरवाडकरांच्या ‘नटसम्राट’ नाटकातील, गणपतराव बेलवलकरांचं, कुणी घर देता का घर, हे जे स्वगत आहे, अगदी तशीच अवस्था मराठी माणसाची झालेली आहे. अशी ‘घरघर’ लागूच कशी शकते, मराठी माणसाला आपल्याच हक्काच्या महाराष्ट्रात? माणसांना घरं नाहीत आणि घरांना माणसं नाहीत, असा विलक्षण विपरीत काळ घराच्या-दुकानांच्या साठेबाजीतून सध्या मराठी-माणसांवर येऊन ठेपलाय, अशा रोखठोक शब्दांत ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कामगार नेते राजन राजे यांनी आपले मनोगत व्यक्त केले...ते दादर येथील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या, टिळक भवन येथील सभागृहात बोलत होते.

गिरणी कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काच्या परवडणाऱ्या घरांसंदर्भात, दि. १२ ऑक्टोबर-२०२५ रोजी,



जैन-गुज्जू-मारवाडी भांडवलदारांना आणि त्यांना साथ देणाऱ्या मराठी राजकारणी-दलालांना आवरलं नाहीत... वेळीच जागे झाला नाहीत; तर, लक्षात ठेवा, एकदिवस वेळ अशी येईल की, जसा तुम्ही जमिनीवर-पाण्यावर कर भरता; तसाच, तो उद्या सूर्य-किरणांवर ते कर भरायला लावतील...सूर्यकिरणांचा ‘सातबारा’च त्यांच्या नावावर करुन घेतील, इतकी गंभीर परिस्थिती आहे.

आयोजित केलेल्या ‘घर हक्क परिषदे’च्या मेळाव्यात राजन राजे उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पुढे म्हणाले की, **बारा तासांसाठी बारा हजार रुपये अशी महाराष्ट्रातील भयानक परिस्थिती आहे. मुंबई सोडाच, ठाण्यासारख्या शहरात पाचशे-साडेपाचशे चौरसफुटांचा वन बीएचके फ्लॅट, ५० लाखांत येतो. नोकरी साधारण पस्तीस वर्षांची धरली तरी, कामगाराचा सगळा पगार दरमहा हप्ते फेडण्यात गेल्यावरच, त्याची नोकरी संपताना तो फ्लॅट खऱ्या अर्थाने त्याच्या मालकीचा होणार... या काळात तुम्ही भोजन-खानपान, कपडालत्ता, मुलाचं शिक्षण-आरोग्य कशाकशावर म्हणून खर्च करायचा नाही, हौसमौज तर विसरुनच जा...फक्त, एका हाताने पगार घ्यायचा आणि दुसऱ्या हाताने तो बँकेत भरायचा आणि शहरातल्या प्रदूषित हवेवर घरात कोंडून जगायचं... आहे शक्य कोटीतलं हे भयंकर आक्रित? एवढी केविलवाणी परिस्थिती मराठी सामान्य जनांची आपल्याच महाराष्ट्रात झालीच कशी??**

...जर, अजूनही तुम्ही या जैन-गुज्जू-मारवाडी भांडवलदारांना आणि त्यांना साथ देणाऱ्या मराठी राजकारणी-दलालांना आवरलं नाहीत...वेळीच जागे झाला नाहीत; तर, लक्षात ठेवा, एकदिवस वेळ अशी येईल की, जसा तुम्ही जमिनीवर-पाण्यावर कर भरता; तसाच, तो उद्या सूर्य-किरणांवर ते कर भरायला लावतील...सूर्यकिरणांचा ‘सातबारा’च त्यांच्या नावावर करुन घेतील, इतकी गंभीर परिस्थिती आहे.

वर्ष १९७०पर्यंत प्रत्येक प्रौढ व्यक्तिला जास्तीतजास्त एकच फ्लॅट खरेदी करता येत होता; पण, बिल्डर राजकारण्यांनी आणि राजकारणातून ...पृष्ठ क्र. ३ वर

## ठाण्याचं ‘वाटोळे’ करणारे अनेक ‘पाटोळे’सारखे भुजंग...

### कित्येक दशकांपासून ठाणे-महापालिकेच्या तिजोरीला ‘वेटोळे’ घालून बसलेत...!!!




**Thane is a Dying City... काँक्रिटच्या उंचच उंच गगनचुंबी ठोकळ्यांमध्ये आणि रस्त्यावरच्या वाहतूक-कोंडीमध्ये, श्वास गुदमरलेलं असं, जर भारतातलं कुठलं एकमेव शहर असेल; तर, ते आहे ‘ठाणे’ शहर...एक सुन्न-मरणासन्न झालेलं शहर, म्हणजे ठाणे-शहर!**


...तरीही, ठाण्यातले बडे बडे गुंडपुंड राजकारणी व महापालिकेतले अधिकारी, रोज उठून ६०-६५ मजली नव्या बांधकामांच्या योजना आखतातच आहेत...पृष्ठ क्र. ६ वर

## केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे.. सौ सुनार की, एक ‘धर्मराज्य’ की.....

हळूहळू आपल्या ग्लानीतून, दीर्घकालीन निद्रेतून जागा होत जाणारा आमचा समस्त मराठी कामगार-कर्मचारीवर्ग, आमच्या भाईंना, या दिपावलीच्या मंगलसमयी आश्वस्त करतो आहे की, आमच्या भाईंच्या स्वप्नातील ‘कामगारांची सत्ता’, आम्ही नजिकच्या भविष्यात भगीरथ प्रयत्नांती खेचून आणूनच आणि त्या सत्तेतून शिवछत्रपतींचं कल्याणकारी-महाराष्ट्र राज्य निर्माण करुच...!!!

आमचे भाई (धर्मराज्य पक्षाध्यक्ष, राजन राजे) नेहमी म्हणतात तसं, कामगारांची सध्याची अवस्था...पृष्ठ क्र. ९ वर

अंतरंग



संघ : सत्तेचा गुलाम, सत्याचा दुष्मन
- विजय तेंडुलकर,
(ते दिवस - राजहंस प्रकाशन, पुणे, २००९, पृष्ठे ७१ ते ७३)
पृष्ठ क्र. ८



महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने घटनेची पायमल्ली करणे टाळावे !
....अविनाश पाठक
पृष्ठ क्र. १४



भक्तांनो, आधी हे वाचा...
....दिलीप मिश्रा
पृष्ठ क्र. १०

# ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चा ऐतिहासिक विजय

## संघटनेच्या बळावर मिळाली भरघोस रक्कम

### ‘रेप्रो इंडिया’च्या संपकरी कामगारांना मिळाली २५ ते ३५ लाखांपर्यंतची कायद्याच्या पलिकडची देणी!

**ठाणे (प्रतिनिधी) :** नवी मुंबईच्या महापे एमआयडीसीमधील ‘रेप्रो इंडिया लिमिटेड’ या कंपनीतील ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’च्या कामगार सभासदांचा ‘आनंद-मेळावा’ मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर-२०२५ रोजी, ठाण्यातील मॉडेला चेकनाका येथील ’आर नेस्ट’ या वातानुकुलीत सभागृहात मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. ‘धर्मराज्य पक्ष’ आणि ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगारनेते मा. राजन राजे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. दरम्यान, पगारवाढ आणि आपल्या न्याय्य-हक्कांसाठी लोकशाही व सनदशीरमार्गाने ‘रेप्रो’च्या २८७ कामगार सभासदांनी, दि. ६ मार्च-२०१७ रोजीपासून, व्यवस्थापनाविरोधात बेमुदत संप पुकारला होता. त्यासंदर्भात, मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे कंपनी व्यवस्थापनाविरोधात दावा दाखल करण्यात आला होता. अखेर साडेआठ वर्षांच्या संघर्षानंतर, व्यवस्थापनाने सामंजस्याची भूमिका घेत, सर्व संपकरी कामगारांची २५ ते ३० लाखांपर्यंतची कायदेशीर देणी, या सोहळ्याच्या निमित्ताने धनादेशाद्वारे मा. राजन राजे यांच्या शुभहस्ते अदा केली. **‘रेप्रो**



**इंडिया लिमिटेड’ या कंपनीतील कामगार सभासदांचा कायदेशीर लढा, युनियनचे वकील के. टी. विश्वनाथन यांनी मोठ्या नेटाने लढवला आणि त्याला तेवढीच खंबीर साथ, ‘धर्मराज्य’च्या कामगार सभासदांनी दिली. या कालावधीत ‘राजन राजे’ नावाचा पंचाक्षरी मंत्र सदैव कामगारांना प्रेरणा देत राहिल्यामुळेच, तब्बल आठ-साडेआठ वर्षे, कामगार सभासद आपल्या निर्णयापासून तसूभरही ढळले नाहीत, ही सर्वात उल्लेखनीय बाब होय...** याच पार्श्वभूमीवर या ‘आनंद-मेळाव्या’चे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला व्यवस्थापनाच्या वतीने, कंपनीच्या लीगल हेड व कंपनी सेक्रेटरी अलमिना शेख आणि कंपनीचे अकाऊंटंट समीर चौगुले उपस्थित होते. यावेळी ‘रेप्रो’च्या कामगारांचे कुटुंबीयदेखील आवर्जून उपस्थित होते. याच सोहळ्याचे औचित्य साधून, मा. राजन राजे यांनी उपस्थित कामगारांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे मन:पूर्वक अभिनंदन करुन, त्यांच्या भविष्यातील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सध्या देशातील कामगार-कष्टकरीवर्गाची अवस्था अत्यंत बिकट असून, केंद्र सरकारपुरस्कृत येऊ घातलेल्या काळ्या कामगार-संहितेमुळे, भविष्यात कामगारांना आपल्या हक्कासाठी संप, उपोषण आणि आंदोलने करता येणार नाहीत. ज्या भाजपला तुम्ही निवडून दिलंत, त्याच पक्षाने कामगार देशोधडीला लावायला घेतलाय. तुम्हाला गणेशोत्सव-नवरात्रौत्सव, दहीहंड्या, जातीय व धार्मिक विद्वेष यातच गुंतवून ठेवत, सर्वसामान्य जनतेचा बुद्धिभेद करण्याचे कारस्थान, भारतीय जनता पक्षाने हाती घेतलेले आहे... वेळीच सावध झाला नाहीत; तर, तुमच्या पुढच्या पिढीचे भविष्य अंधकारमय होणार हे निश्चित! अशा परखड शब्दांत मा. राजन राजे यांनी, उपस्थित कामगारांना मर्गदर्शन केले. दरम्यान, याप्रसंगी ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव महेशसिंग ठाकूर, उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव समीर चव्हाण आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

---

## महाराष्ट्र: लाडकी बहीण, बिहार १०,००० रुपये इत्यादी

### स्त्रियांच्या बँक अकाउंटमध्ये सरकारने डायरेक्ट कॅश ट्रान्सफर केल्याने स्त्रियांची परिस्थिती नक्की किती सुधारते?

( कर्नाटक, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, तेलंगणा या राज्य सरकारांनी देखील महिलांच्या बँक अकाउंट मध्ये डायरेक्ट कॅश ट्रान्सफर अशा योजना राबवल्या आहेत).

वित्तीय सामिलीकरणासाठी (फायनान्शिअल इन्क्लूजन), देशाच्या अर्थ व्यवस्थेत सक्रिय होण्यासाठी प्रत्येक प्रौढ नागरिकाचे बँक खाते असणे ही अत्यावश्यक अट आहे. मान्य.

पण बँक अकाऊंट काय स्वांतसुखाय असतो का? ते तर एक माध्यम आहे. कशासाठी? तर आपल्याकडील बचती साठवण्यासाठी, कर्ज काढण्यासाठी, कर्जाची परतफेड करण्यासाठी, पैशाची देवाण-घेवाण करण्यासाठी. असे करून कुटुंबाचे भौतिक राहणीमान सुधारले ( हे दुसरे अधिक महत्वाचे) तरच त्या बँक अकाउंटचा उपयोग. नाहीतर काय मिरवायचा आहे बँक अकाउंट.

वस्तुस्थिति काय आहे ? जागतिक बँकेच्या Findex ताज्या अहवालानुसार, गेल्या वर्षभरातील, बँक अकाउंट असलेल्या स्त्रियांची खालील आकडेवारी पहा. ( आकडे टक्क्यांमध्ये)

***बँक खात्याचा कोणताही उपयोग केला नाही: १८***

***आपल्या बँक खात्यात बचती ठेवल्या: २१***

***बँकेकडून कर्ज घेतले: १२***

***बँकेकडून डेबिट कार्ड घेतले: २५***

***डेबिट कार्ड किंवा मोबाईल फोनवरून पेमेंट केले: १९***

***निरनिराळे बिले भरण्यासाठी बँक अकाउंट चा उपयोग केला: ८***

***बँक अकाउंट चेक करण्यासाठी मोबाईलचा उपयोग केला: २७***

***घरातील पुरुषाची मदत न घेता बँक व्यवहार केले: २८***

***स्वत:च्या नावावर मोबाईलचे सिमकार्ड आहे: ३२***

***किंमत परवडत नसल्यामुळे मोबाईल घेतलेला नाही: ३२***

***टेरीफ चार्जेस परवडत नसल्यामुळे मोबाईल घेतलेला नाही: ३८***

(सर्व आकडेवारी, डाटा पॉईंट, हिंदू ऑक्टोबर १३, २०२५, पान क्रमांक ७)

जागतिक बँकेला कोणीही डाव्या विचारसरणीचे किंवा अर्बन नक्सल म्हणणार नाही अशी आशा आहे.

शासन फक्त आकडेवारीचे चकचकीत आरसे मीडियाच्या मदतीने फिरवत आपल्या सर्वांचे डोळे दिपवत असते. आकडेवारी शिजवलेली नसते. पण, फक्त सोयीची तेवढीच आकडेवारी तोडून सार्वजनिक व्यसपीठांवर पोलिटिकल मायलेजसाठी सतत ठेवली जाते. जमिनी सत्ये वेगळीच असू शकतात.

त्याच्या कारणांमध्ये जाण्याचा, त्यावर उपाययोजना करण्याची प्रगल्भता आणि प्रामाणिकपणा राजकीय नेतृत्वात नाही हे दुर्दैव. मग ते स्वतः कितीही हलाखीतून, कोणत्याही वर्ग-जातीतून आलेले असतील.

मध्यमवर्गातील ओपिनियन मेकर्सबद्दल काय बोलणार?

डाव्या-उजव्या विचारसरणीच्या बायनरीच्या पलीकडे बौद्धिक प्रामाणिकपणा आणि ही सर्व आपली माणसे आहेत अशी संवेदनशीलता असली पाहिजे.

*– संजीव चांदोरकर*

---

**अंतःकरणाला हात घालणारं, भारतीय-अध्यात्माला प्रतिबिंबित करीत निखळ सत्याकडे धाव घेणारं... अलिकडच्या काळात ऐकलेलं एक अतिशय प्रभावी भाषण!**

...हे भाषण किंवा भाष्य, अशा एका आधुनिक जगण्यातील ‘कलाक्रिडे’सारख्या मनोरंजनात्मक क्षेत्रामधून अचानक फोफावत उगवलेलं सकस धान्याचं पीक आहे... जिथे, आजुबाजुला सर्वत्र तणंच तण उगवलेलं आहे. कधि त्या तणाचं नाव अमिताभ बच्चन असतं, तर कधि नाना पाटेकर किंवा सचिन तेंडुलकर! ...आणि हो, त्यात ब्रूट्स यू टू या नीतिने मोदींसमवेत पतंग उडवणाऱ्या शाहरुख खान आणि सलमान खान यांच्या नावाचं देखील ‘तण’ असतं, हे विसरुन चालणारं नाहीच. ...दुर्दैवाने इतना सन्नाटा क्यूँ है भाई, असं विचारणारा ‘शोले’मधला ‘रहीमचाचा’ ए. के. हंगल आज आपल्यात नाही...पैसा-प्रसिद्धीचं जोखड मानेवर घेतलेल्या व ‘करियर’च्या दावणीला बांधल्या गेलेल्या; या नपुंसक कलाक्रिडा क्षेत्रात जिथे, पडद्यावरचा ‘अँग्री यंग मॅन’ करोना-काळात व इतरही वेळी टाळ्या-थाळ्या वाजवत, नतद्रष्ट-जातधर्मद्वेष्ट्या भाजप-संघीय धुरिणांसमोर आपल्या ‘पेशा’ची माती खाताना दिसतो...तिथे, अन्याय-अत्याचाराची परिसीमा होऊनही, इथल्या कुठल्या ‘अल्बर्ट पिंटो’ला ‘गुस्सा’ येण्याची कितपत शक्यता...???... प्रकाश राज, अगदी अभावाने व अपवादाने असतात; पण कंगना राणावत, अक्षयकुमार आणि अनुपम खेर ‘पायलीचे पन्नास’ पैदा होत रहातात...म्हणूनच, भारतीय-अध्यात्माचा ‘आत्मा’ छिन्नभिन्न करणाऱ्या या उजव्या अतिरेक्यांची, या परमपवित्र भरतभूमीत ‘शंभरी भरण्या’ऐवजी, ते आज ‘शंभरी साजरी’ करताहेत! ***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## ...कुणी घर देता का घर, अशी 'घरघर' लागलेली मराठी माणसाची अवस्था! ...राजन राजे ...पृष्ठ क्र. १ वरुन

बिल्डर बनलेल्यांनी घरांचं बांधकाम, हा 'उद्योग' बनवला व आपल्या नफेखोरीतल्या सगळ्या अडचणी, अटीशर्ती काढून टाकल्या; त्यामुळे फ्लॅट व दुकाने खरेदी, हा बक्कळ परतावा देणारा गुंतवणुकीचा मार्ग व त्यातूनच, काळ्या पैशाचा मोठा स्त्रोत बनला!

**अन्न, वस्त्र, निवारा म्हणजे घर, हा माणसाचा नैसर्गिक व मूलभूत अधिकार असताना...१९७०नंतर घरांची प्रचंड साठेबाजी व काळाबाजार सुरु होऊन भाव गगनाला भिडायला लागले व त्यातच मराठी कामगार-कर्मचारीवर्ग कायमच पिचला जायला लागला!**

...तेव्हा, लक्षात ठेवा, सुदैवाने वर्ष १९७७-७८च्या राज्यघटनेतील ४४व्या घटनादुरुस्तीमुळे सुदैवाने 'संपत्तीचा-अधिकार', हा आता 'मूलभूत-अधिकार' राहिलेला नाही. तो आता फक्त, कायदेशीर-अधिकार आहे; म्हणूनच कायदा करुनच 'संपत्तीचं फेरवाटप' व्हायला हवं! त्याकामी, शहर-उपनगरांमधून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे एक मकान, एक दुकान असा कायदा व्हायला हवा...तो झाल्याशिवाय, गगनाला भिडलेले फ्लॅटस् आणि दुकानांचे भाव पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळणार नाहीत!

...जसं भूदान-चळवळीतून विनोबा भावेंनी सब भूमी गोपाल की गर्जना करत, लाखो हेक्टर जमीन फेरवाटपासाठी मिळवली; तसेच, हे अतिरिक्त लाखो फ्लॅट्स व दुकाने... सिंगापूरच्या धर्तीवर, महाराष्ट्र-सरकारने ताब्यात घेऊन सुशिक्षित मराठी-तरुणाईला, वाजवी भाड्याने उपलब्ध करुन द्यायला हवीत...तरच, मराठी माणूस मुंबई-महाराष्ट्रात सन्मानाने व सुखासमाधानाने अस्तित्वात राहील...अन्यथा मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर (मुंठापुराना) शहरांतून त्यांचं साफ उच्चाटन होईल व वाघांसाठी जशी चंद्रपुरच्या ताडोबासारखी अभयारण्ये राखावी लागलीयत; तशी सामान्य मराठी-माणसांसाठी 'अभयारण्ये' निर्माण करावी लागतील!

**...या परिषदेच्या निमित्ताने विविध २७ पक्ष-संघटना एकत्र आलेत, ही फार चांगली गोष्ट आहे. पण, एवढ्यावर थांबून चालणार नाही,** हर्षवर्धन सपकाळ यांच्यासारखे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आपल्याला लाभलेले आहेत, जे खरंतर चळवळीतून आलेले आहेत. ते कुठल्या बड्या श्रीमंत घराण्यातून आलेले नाहीत की, एखाद्या बड्या राजकारण्याच्या घरात पाळणा हलला, म्हणून ते नेते झालेले नाहीत, म्हणूनच त्यांच्याकडून आमच्या खूप अपेक्षा असल्याच्या भावनादेखील राजन राजे यांनी बोलून दाखवल्या. **यावेळी राहुल गांधी यांचं कौतुक करताना, ते पुढे म्हणाले, मला महात्मा गांधी आणि पं. जवाहरलाल, या दोन्ही व्यक्तित्वांचा 'संगम' राहुल गांधीमध्ये दिसतो... आज ही माणसं काँग्रेसमध्ये आहेत, म्हणून आशा करायला काही जागा आहे... राष्ट्रीयस्तरावर राहुल गांधी तर, राज्यस्तरावर हर्षवर्धन सपकाळांसारखी नेतेमंडळी आहेत, म्हणून आम्ही काँग्रेससोबत आहोत. राहुल गांधींसोबत महाराष्ट्राचे 'भीष्माचार्य' कुमार केतकर आहेत आणि हर्षवर्धन सपकाळांसोबत महाराष्ट्राचे 'द्रोणाचार्य' विश्वास उटगी आहेत, अशा ओघवत्या शैलीत राजन राजे यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं.**

...याप्रसंगी, व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार आणि माजी खासदार कुमार केतकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष विश्वास उटगी, सर्व श्रमिक संघाचे अध्यक्ष शिशिर ढवळे, आयटकचे सुकुमार दामले, कम्युनिस्ट पक्षाचे मिलिंद रानडे, गिरणी कामगारांच्या वकील गायत्री सिंग यांच्यासह, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कामगार-सभासद तसेच, कामगारक्षेत्रातील व डाव्या चळवळीतील मान्यवर मंडळी मोठ्यासंख्येने उपस्थित होती.

# मराठी-श्रमिकवर्गाच्या हितासाठी, 'धर्मराज्य'ची पताका !

**ही, नरेचि हीन केला किती नर, अशी झालेली असल्याने...डॉ. दत्ता सामंतांसारख्या सामर्थ्यशाली व लढवय्या कामगार-नेत्याची भांडवली-व्यवस्थेनं निर्घृण हत्या घडवल्यानंतर, पोरकी झालेल्या व एकाकी पडलेल्या 'कामगार-चळवळी'ला एक हाती सावरुन जर कोणी धरलं असेल; तर, ते आमच्या भाईंनीच!**

हा आमचा 'भाई' म्हणजे, गुंडागर्दी करणारा तसा, कुठला आवारा प्रस्थापित-राजकारणी 'भाई' नव्हे; तर, ज्या प्रेमाने व अदबीने डाव्या चळवळीतील कार्यकर्ते 'कॉम्रेड' वा 'साथी' असं, एकमेकाप्रति संबोधन करतात...तसंच, किंवा त्याही पलिकडचं प्रेमादराचं व हक्काचं संबोधन होय.

डॉक्टरांच्या पश्चात कोसळू पहाणाऱ्या कामगार-चळवळीला आमचे भाई, 'राजन राजे' यांनीच पुढे होत, खंबीर हात दिला व त्या एक खांबी तंबूवर, महाराष्ट्रातली समस्त कामगार-चळवळ आजवर तग धरुन उभी आहे (जिथे, आमची 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाची युनियन नाही...तिथेही, अनेक युनियन कमिट्या 'चालूगिरी' करत, राजन राजे यांची 'धर्मराज्य' युनियन आणतो; असं व्यवस्थापनाला 'ब्लॅकमेल' करत मोठे करार करवून घेतात), असं कुणी म्हटलं तर, वावगं ठरु नये.

आम्हाला स्मरतं की, प्रिमियम-ऑटोमोबाईलच्या लढ्यात, डॉ. दत्ता सामंत धडाधड एकापाठोपाठ एक मोठमोठ्या पगार/बोनस वाढीचे दणके देत असताना... प्रिमियर-कंपनीच्या गेटवर एका स्टुलावरुन कामगारांसमोर भाषण करत असताना डॉक्टर मोठ्या अभिमानाने म्हणाले होते की, आज माझा प्रिमियरचा साफसफाई करणारा कामगार, भारताच्या राष्ट्रपतींपेक्षा मोठा पगार घेतोय (तेव्हा, राष्ट्रपतींचा पगार दरमहा रु.१०,०००/- होता); याचा मला ऊरभरला आनंद आहे! काळाने कूस बदलली...डॉक्टरांच्या जागी, आमचे 'भाई' आले आणि 'सिम सिम खुल जा' असा कामगार-कर्मचारीवर्गाच्या आर्थिक-उन्नयनाचा, जगन्नाथाचा रथ पुन्हा मार्गस्थ झाला!

...आणि, छोट्यामोठ्या कंपन्यांपासून अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये 'सहा आकडी' (म्हणजे, लाखाहून अधिक रकमेचे) पगार व बोनसचे आकडे दिवाळीतल्या रॉकेटसारखे अस्मानावेरी उसळू लागले.



...मात्र, त्यानंतरच्या काळात, कामगारहितविरोधी अशा दोन अघटित घटना घडल्या... एक म्हणजे, सगळ्या 'भांडवली-व्यवस्थेनं एकत्रित येत कामगार-चळवळीवर 'कंत्राटी-कामगार पद्धती'चा हल्लाबोल केला; त्यामुळे, राजकीय-ताकदी अभावी महाराष्ट्रातल्या औद्योगिक व सेवा क्षेत्रात 'गुलामगिरी'चं धुमशान घालणाऱ्या, या कंत्राटी-अवदसेला रोखणं अशक्यप्राय बनत गेलं (तरीही, 'धर्मराज्य'ने शून्य राजकीय-ताकद असतानाही शर्थीने प्राणांतिक झुंज देत, आपल्या प्रभावक्षेत्रातून, या अवदसेला शिरकाव करु दिला नाहीच) आणि दुसरं म्हणजे...जो 'राजन राजे' यांनी स्वहस्ते उभारलेला 'बालेकिल्ला' भारतभरच नव्हे; तर, जगभर गाजत होता...त्यालाही काही नतद्रष्ट, नीच-अधम प्रवृत्तींची नजर लागली...आणि, तो 'सुल्झर पंप्स' नवी मुंबई, दिघा या कंपनीतील आमच्या भाईंचा कामगारहिताचा सत्याचा प्रयोग एका मोठ्या धर्मसंकटात व चोर-दरोडेखोर-लुटेऱ्यांच्या घेऱ्यात सापडला!

**...अशा विपरीत स्थितीतही, आम्हाला कळविण्यास अतिशय अभिमान व आनंद होतोय की, या वर्ष-२०२५च्या दिपावलीत आमच्या 'धर्मराज्य'कडील किमानपक्षी तीन कंपन्यांमध्ये....**

**१) इडिकॉन कंपनी (रबाळे),**

**२) हिवा-इंडिया (महापे)**

**३) प्रोटेगो इंडिया (रबाळे)**

**'सहा आकडी' म्हणजे, एक लाखाहून अधिक रकमेचा 'बोनस' संबंधित कामगारांना मिळवून देण्यात आलेला आहे!**

**पकोटेक्स, वॉलमेट, शेरॉन बायोमेडिसीन, जॉन्सन-मॅथ्यू, DRT-ॲंथिया (रोहा)... यासारख्या अनेक कंपन्या, त्याच पद्धतीने प्रगतीपथावर आहेत व त्याही, पोलादी कामगार-एकजुटीच्या बळावर व 'धर्मराज्य'च्या बिरुदाखाली, या 'सहा आकडी' सन्मानाला लवकरच पात्र ठरतील, अशी आशा करुया....**


'सहा आकडी' पगार व 'सहा आकडी' बोनस...हा चमत्कार घडवणारा, महाराष्ट्रातीलच नव्हे; तर, संपूर्ण भारतातील एकमात्र 'कामगार-नेता' राजन राजे... तेव्हा, मराठी-श्रमिकवर्गाच्या हितासाठी ही 'धर्मराज्य' पताका, याहीपुढे अशीच दिमाखात फडकत राहो, ही लक्ष लक्ष मंगल-ज्योतींच्या साथीने ईशचरणी प्रार्थना...धन्यवाद!

आपले नम्र,

*- समीर चव्हाण, रत्नदीप कांबळे, निरंजन म्हात्रे*

# आज या क्षणापुरते तरी 'वल्लभभाई पटेल' हवे होते...दोन 'गुजराथी' गृहमंत्र्यांमधला जमीन अस्मानाचा फरक, पुरता स्पष्ट झाला असता!

देशाचा पंतप्रधान, आपल्या 'संघ-प्रचारका'च्या भूमिकेला कायमच स्मरत, धर्मविद्वेषाची आणि महिलावर्गाच्या द्वेषाची 'मदिरा' पिऊन शब्दाशब्दाला बरळत असतो (उदा. मंगळसूत्र, मुसलमान, मटण, ५० करोड की गर्लफ्रेंड, काँग्रेस की विधवा वगैरे वगैरे); ते निवडणूक-आयोगापासून न्यायालयांपर्यंत सगळ्यांना चालतं...पण, एखादा शब्द चुकीने मुखातून बोलण्याच्या ओघात बाहेर पडला व तो पडल्यानंतर त्याबद्दल व्यवस्थित दिलगिरीयुक्त खुलासा केला गेला...तरीही, जर देशातल्या कुडमुड्या सनातन्यांचा पोटशूळ उठणार असेल आणि त्याची परिणती जर 'भूषण गवई'सारख्या देशाचं 'भूषण' असलेल्या सरन्यायाधीशावर पायताण फेकून तो व्यक्त होणार असेल; तर, हे सना'तन' नावाचं 'तण' या भरतभूमीसारख्या सुपीक-सकस आध्यात्मिक-प्रदेशातून उपटून फेकून दिलं पाहिजे!



लक्षात घ्या की, ते काम पुढील पिढ्या निर्विवादपणे करतीलच. बूट फेकणाऱ्या त्या हरामजाद्या वकिलाला धड शिक्षाही होत नाही आणि वरुन पोलीस मोठ्या इतमामात त्याचा फेकलेला बूट त्याला परत देतात; याचा नेमका काय अर्थ काढायचा...???

जे आज उन्मत्तपणे If you cannot convince, then confuse, या ढोंगी बदमाषीने जनमानसाची दिशाभूल करत, संघटनेची शंभरी साजरी करताहेत, त्यांची सनदशीर 'शंभरी' नजिकच्या भविष्यात भरेलच!

निव्वळ 'जातधर्मविद्वेष व भूलथापा-अफवा' पसरवण्याच्या पायावर उभ्या राहिलेल्या भाजप-मातृसंघटनेचा सगळ्याच प्रकारचा 'व्यवहार', हा संशयास्पद असून 'नोंदणीविना' आजही चालतो... म्हणूनच, आज वल्लभभाई पटेल हवे होते.

...वल्लभभाई पटेल का हवे होते? कारणही तसंच आहे, केवळ संशयाची सुईच नव्हे; तर, ज्यापद्धतीने देशातल्या तमाम मुस्लिमांसह सर्व जातधर्मातल्या गोरगरीब कष्टकरीवर्गाला व उंबरठ्याबाहेर पडण्याची प्राज्ञा (हिंमत) नसणाऱ्या समस्त महिलावर्गाला, देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रथमच म. गांधींनी जोडून घेतलं होतं... त्याविरुद्ध, **'संघीय-प्रवृत्ती' गरळ ओकू लागल्या होत्या. त्याचाच परिपाक म्हणजे, 'गांधीहत्या'... म्हणूनच तर, वल्लभभाई पटेलांनी लागलीच त्यावर बंदी घातली होती. अगदी तसंच, बी. आर. गवई ही दलित व्यक्ति देशाची सरन्यायाधीश झाल्यापासून या असल्या सनातनी-संघीय अपप्रवृत्ती, राजरोस समाजमाध्यमांतून आपल्या पोटात साठलेली व खोलवर आतड्यांपर्यंत पसरलेली विद्वेषाची घाण, संघीय-शिकवणुकीचं रेचक घेऊन खळबळून बाहेर टाकत होते. त्याचीच परिणती, आज सरन्यायाधीशांवर बूट फेकण्यात झालीय, हे विसरुन चालणार नाही.**

...ही थेरं अशीच चालणार व वाढणार असतील; तर, न्यायालयीन-बढतीमध्ये देखील आरक्षण मागावं लागेल...नाहीतरी, मोठे विद्वान-पंडित म्हणून गणले गेलेले; पण, आतून 'भांडवली-व्यवस्थे'च्या 'अंकित' असलेले... दीपक मिश्रा, रंजन गोगई, बोबडे, रामण्णा, चंद्रचूड वगैरे उच्चवर्णीय-उच्चवर्गीय न्यायाधीशांनी काय दिवे लावले, ते जगाने पाहिलेतच.

...म्हणूनच, आता मुठभरांच्या वर्चस्ववादी-अपप्रवृत्तींना जोपासणाऱ्या या अशा 'भांडवली-व्यवस्थे'ला आतून सुरुंग लावण्यासाठी खाजगी क्षेत्रातही जिसकी जितनी संख्या भारी, उतनी उसकी हिस्सेदारी अशी, आरक्षणाची भूमिका घ्यावी लागेल...तेव्हाच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'समतेचा संदेश' व्यवहारात उतरण्यास चालना मिळेल...कंत्राटी-कामगार पद्धत, आऊटसोर्सिंग वगैरेंचं उच्चाटन करण्यासाठी आधार मिळेल.

...अर्थातच, याकामी बहुजनांनाही (मग, ते कामगार असोत, शेतकरी, मुसलमान वा दलितवर्गातील असोत) या देशाचे नागरिक म्हणून, अत्यंत जबाबदारीने व संयमाने वागावं लागेल...शिक्षणाची, सुसंस्कृततेची व नीतिमत्तेची कडवी कास धरावी लागेल!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## प्रतिस्पर्ध्यांचे चारित्र्यहनन करत खालची वयक्तिक पातळी गाठणं हे संगोट्यांचं ठरलेले शस्त्र असतं.

बलरामपूर मतदारसंघात १९६२ साली जनसंघाचे अटल बिहारी वाजपेयींच्या विरोधात निवडणूक लढवणार्या काँग्रेसच्या सुभद्रा जोशी यांना हयाचा सामना करावा लागला.हिंदू संस्कृतीत सौभाग्याचे प्रतीक असलेले कुंकू,बांगड्या,यापैकी काहीही सुभद्राताईंच्या अंगावर दिसत नाही ?? असा प्रचार वाजपेयी करत ज्याला सुभद्रा जोशी जाहीर सभेतून ठामपणे प्रत्युत्तर देत मी इथं निवडणूक लढवायला आले आहे नाटकं करून जनतेची फसवणूक करायला नाही,वाजपेयी जे सांगताय ते खरं आहे पण मी जशी आहे तशीच राहणार. लोकप्रियतेच्या शिखरावर असतांना देखील ही निवडणूक वाजपेयी हरले होते.

संघोटे स्त्रियांविरोधातही संयमित भाषा वापरू शकत नाहीत हे सध्या आपण पाहतच आहोत पण ही त्यांची संस्कृतीच नाही तर संस्कार पण आहे फक्त दिखावा म्हणून हसऱ्या चेहऱ्याने शुद्ध वाणी बोलायची आणि विरोधकांचं खच्चीकरण करायचं...भुलू नका यांच्या वागण्याला ..

संदर्भ :२४ अकबर रोड, पृष्ठ क्रमांक: ७२

*– रशीद किदवाई*

# 'कबूतर-छाप' पक्ष

ते आले महाराष्ट्रात तेव्हा...'काळी-टोपीधारी' हाफचड्डीवाल्या लोकांसारखेच (हल्ली, 'फूल चड्डी'...ज्यासाठी ते, कुठला संस्कृत शब्द नव्हे; तर, चक्क पँट हा 'आंग्ल' शब्द वापरतात) इंग्रजांचे दोस्त व स्वातंत्र्य-चळवळीचे 'मारेकरी' म्हणूनच....

ते आले महाराष्ट्रात तेव्हा...त्यांच्या हातात 'लोटा' नव्हताच; तर, हाती होत्या इंग्रजांनी दिलेल्या 'बीज-भांडवल'स्वरुप 'नोटा' अन् विविध सरकारी-कंत्राटांचा 'लखोटा'!

ते आले महाराष्ट्रात, तेव्हा 'शिवबां'चा महाराष्ट्र 'पुण्यवान' होता, नितीमान होता; पण, ते आले आणि त्यांनी महाराष्ट्रात बेईमानीने भेसळ, वजनमापात पाप अन् आपल्या जमातीचं 'संघटना-छाप' अर्थकारण (मराठी-माणसाच्या दृष्टीने 'अनर्थकारण') करायला घेतलं. त्यातून बक्कळ पैसा कमावला, गब्बर झाले...आणि, आपल्या जमातीच्या नीतिशून्य, वाममार्गी संस्कृतिने...महाराष्ट्राची सोन्यासारखी असलेली 'मराठी-संस्कृती' पार बिघडवून, महाराष्ट्रातल्या मराठी-माणसाच्या उरावर ते बसायला लागले... ते अगदी थेट, मराठी-माणसांनी देव्हाऱ्यात बसवलेल्या नेत्यांचा हात धरुन अन् त्यांची 'ओटी' भरुन!

**ते आले महाराष्ट्रात तेव्हा....**

...आता ते नुसतेच आले नव्हते; तर, शहरं-उपनगरांच्याच काय; तर, गावागावांच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते; तेव्हा त्यांच्या हाती होत्या...फुकटात वाटण्यासाठी आणलेल्या शालोपयोगी वस्तू (वह्या-पुस्तके, पाटीपेन्सिल) व क्रिकेट खेळाचं साहित्य वगैरे वगैरे...जे जागोजागच्या मराठी-नेत्यांच्या हाती, त्यांनी सोपवलं...अर्थातच, फुकटात वाटण्यासाठी आणि त्यातून नेतेपद मिरविण्यासाठी!

...आणि, सोपवल्या नोटांच्या चळती...भोळ्याभाबड्या मराठी जनसामान्यांना 'फाजील-उत्सवप्रियते'त (सार्वजनिक पूजा-गणेशोत्सव-दहीहंड्या-गरबे-भंडारे इ. इ.) आणि विविध धर्मसंप्रदायात अडकवून ठेवण्यासाठी...जेणेकरुन, त्या ग्लानीत आणि अफुच्या नशेत... मराठी-गुलामाला, आपल्या गुलामीची आणि फसवणुकीची जाणिवच होऊ नये!

ते आले महाराष्ट्रात; सर्वत्र फिरले, वावरले...तेच मुळी, मराठी-ग्राहकांना भरमसाठ लुटून, मराठी-कामगारांचं अतोनात शोषण करुन व 'करचोरी' करुन कमावलेल्या काळ्या पैशाच्या राशी, हातात घेऊनच!

...त्या त्यांनी, मराठी-शेतकऱ्यांच्या हातात ठेवल्या..!!

...आता, फरक एवढाच पडला होता की, तो थोडाथोडका काळा पैसा पडला, शेती कसणाऱ्या 'भूमिपूत्र' मराठी दरिद्री-नारायणाच्या अन् जमीन-विक्रेत्या दलालांच्या हाती...आणि, 'मराठी-सातबारा' पडला, 'त्यांच्या' हाती...!!!

...तेव्हा, 'महाराष्ट्र' नावाच्या आटपाट नगरीची कहाणी थोडक्यात सांगायची; तर, महाराष्ट्रात ते आले, त्यांनी पाहिलं आणि ते जिंकले (Veni, vidi, vici) ...ते ही जिंकले अन् जिंकले 'ते मराठी-नेते'ही...हरले फक्त, उपनगरं-महानगरांच्या सांदीकोपऱ्यात १०'X१०' च्या कोंडवाड्यात आणि 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या पिंजऱ्यात श्वास अडकून पडलेले, ते 'मराठे'!

इतिहासात ते पानिपतावर धारातिर्थी पडले होते; आता धारातिर्थी पडले, ते शिवतिर्थावर अन् टेंभीनाक्यावर...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# संघ-जनसंघ ते भाजप : व्होटचोरीचा प्रवास

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' (स्थापना : २७ सप्टेंबर १९२५) ही 'भारतीय जनता पक्षा'ची (स्थापना : ६ एप्रिल १९८०) 'पितृसंस्था' आहे. तर 'भाजप' ही 'रा.स्व.संघा'ची 'राजकीय शाखा' आहे. हिंदू-हिंदुत्व-हिंदूराष्ट्रच्या नावानं खणखणाट करणाऱ्या नाण्याच्या ह्या दोन बाजू आहेत. हा खणखणाट 'भाजप'चा पूर्वावतारी 'जनसंघ' असल्यापासून भारतीय राजकारणाच्या चलनात आहे. ('जनसंघ' स्थापना : २१ ऑक्टोबर १९५१. इंदिरा गांधी यांच्या सरकारने १९७५ मध्ये अमलात आणलेल्या आणीबाणीच्या राजवटीला विरोध करण्यासाठी १९७७ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर; 'इंदिरा काँग्रेस'विरोधी पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली 'जनता पक्षा'ची स्थापना केली. त्यात सामील होण्याकरिता 'जनसंघ'चे विसर्जन करण्यात आले.) संघाचा हा चेहरा-मुखवट्याचा खेळ 'जनसंघ-भाजप'च्या राजकारणापुरताच मर्यादित नाही.

'जनसंघ-भाजप'च्या राजकारणाला पूरक ठरतील; अशा 'विश्व हिंदू परिषद', 'बजरंग दल', 'राष्ट्रसेविका समिती', 'दुर्गा वाहिनी', 'वनवासी कल्याण आश्रम', 'समरसता मंच', 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद', 'स्वदेशी जागरण', 'संस्कार भारती', 'भारतीय मजदूर संघ', 'जनकल्याण' व 'नागरी सहकारी बँका' अशा 'रा.स्व.संघ' प्रणीत शेकडो संस्था- संघटना; धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, युवा-महिला, आदिवासी-मागास जनजाती क्षेत्रात कार्यरत आहेत. याशिवाय इंग्रजीत, 'ऑर्गनायझर', हिंदीत 'पांचजन्य' (म्हणजे भगवान विष्णूचा शंख), मराठीत 'साप्ताहिक विवेक' प्रमाणेच अन्य प्रादेशिक भाषांतही 'रा. स्व.संघा'ची मुखपत्रं आहेत. 'संघ विचाराचे पत्रकार, साहित्यिक, कलावंतही आहेत. ह्या व्यापक संघ परिवाराने 'जय श्रीराम'चा नारा देत देशाची सत्ता प्राप्त केली तरी, त्याचं मूळ रूप हे रावणासारखे आहे.

रावण 'दहामुखी' होता; त्या दुप्पट त्याला हात होते. पण पाय दोनच होते. परिणामी, तोंडं उलटं-सुलटं बोलत राहिली तरी, पाय दोनच असल्याने रावणाचे धड एकाच दिशेने मार्गक्रमण करी. अशाच रावणी-चालीने संघ आपली १०० वर्षांची वाटचाल पूर्ण करीत आहे. त्याचे लोकशाहीमारक परिणाम गेल्या अकरा वर्षांत ठळकपणे दिसू लागले आहेत. अमेरिकेने लादलेले टेरिफ आणि त्यावर स्वदेशी उपाय, पहलगाम हल्ला, नेपाळ व भारताच्या शेजारील देशातील राजकीय उलथापालथ, भारतात श्रीमंत- गरीब यांमध्ये वाढत चाललेली दरी, समाजातील सर्वसमावेशकता आदि मुद्दे मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात मांडले. पण ह्या साऱ्या मुद्द्यांची पैदास मोदी सरकारच्या बेजबाबदार कारभारामुळे झाली आहे, ही सांगण्याचे धाडस त्यांनी दाखवले नाही.

भारत हा जगातला सर्वात मोठा 'लोकशाही' असलेला देश आहे. ही लोकशाही 'धर्मनिरपेक्ष' (सेक्युलर) आहे. असे असताना 'भाजप'ला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बहुमत प्राप्त (३०३ खासदार) होताच; आवश्यकता नसताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अब्जावधी रुपये खर्चाचे नवे संसद भवन बांधून घेतले आणि त्याच्या उद्घाटनप्रसंगी (२८ मे २०२३) मठाधिपतींच्या मंत्रघोषात तिथे स्वहस्ते 'सेंगॉल' (राजदंड) बसवला. स्पष्ट सांगायचं तर, लोकशाहीच्या उरावर धर्ममार्तंडांनी दिलेला राजदंड रोवला. लोकशाहीत सर्वोच्च स्थानी 'संविधान-राज्यघटना' आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी जवाहरलाल नेहरू देशाचे पहिले प्रधानमंत्री झाले. तेव्हा देशभरातील प्रमुख मठाधिपतींनी त्यांच्याकडे 'धर्म-न्याय-नीती'चे रक्षण करण्यासाठी 'राजदंड' (सेंगॉल) सोपवला होता. नेहरूंनी तो स्वीकारला; पण, त्याची संसदेत स्थापना न करता तो 'इलाहाबाद वस्तुसंग्रहालय'मध्ये पाठवला. नेहरू आणि नेहरू- गांधी घराण्याच्या नावानं अनाठायी गरळ ओकणाऱ्यांच्या अकलेत इतका फरक असणारच; म्हणून ह्या विषयाकडे दुर्लक्ष करता येत नाही.

भारतातील हिंदूधर्मशाही ही जातीनिशी माजलेली नादान भिक्षुकशाही आहे. भिक्षुकशाहीची पोटफुगवी बाळंतपणंही भाकड पुराणकथांतून आणि राजेशाहीच्या दैवीशक्तीतून झालेली आहेत. त्यानुसार राज्याभिषेक झाल्यावर राजतिलक लावून राजमुकुट चढवताना राजाच्या हातात राजदंड दिला जातो. ह्याचा दाखला 'महाभारत' ग्रंथातील 'शांतिपर्व'मध्येही मिळतो. 'ज्येष्ठ पांडव' धर्म तथा युधिष्ठिराच्या राज्याभिषेक वर्णनात; त्याच्या हाती राजदंड सोपवताना, राजदंड हा राजाचा धर्म आहे. हा दंडच धर्माचे आणि अर्थाचे (धनसंपत्ती) रक्षण करील, असा उल्लेख येतो. मध्ययुगीन काळातल्या हिंदू राजांप्रमाणे मुघल सम्राटांनीही राजदंडाचा वापर केलाय. कारण, राजदंडाकडे धर्माबरोबरच दैवी अधिकाराचे प्रतीक म्हणूनही पाहिले जाई. या धारणेतूनच अंधभक्तांना अधूनमधून नरेंद्र मोदी हे 'विष्णू अवतारी' असल्याची दिव्यदृष्टी प्राप्त होते. हे दिव्यदृष्टीप्राप्त 'बुजगावणे' २०२४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारात 'मीडिया-सोशल मीडिया'वरून देश बदलतो आहे. २०४७ मध्ये 'भारत विकसित देश' होणार, अशा बाता मारत होते. पण त्याला साजेसं कार्यकर्तृत्व 'विष्णू अवतारी'ने वा कथित 'चाणक्य'ने गेल्या ११ वर्षांत दाखवलं आहे का ?

जगातील १८० देशांच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात भारताचा क्रमांक सध्या १३६ वा आहे. अनेक छोट्या देशांचे उत्पन्न भारतापेक्षा अधिक आहे. लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ असलेल्या प्रसारमाध्यमांचे कार्यकर्तृत्व १४२ व्या क्रमांकावर आहे...इतका 'मीडिया' पारतंत्र्यात गेलाय. न्याय पालिकेची घसरणही ६९ व्या क्रमांकावर आलीय. संसदेत आणि राज्यांच्या विधानसभेत कायदे बनविले जातात. तिथे लोकप्रतिनिधी म्हणून असणारे खासदार-आमदार मतदारांशी वा पक्षाशी सोडा; पण, स्वतःशी तरी किती प्रामाणिक असतात; ते आपण भयापोटी- स्वार्थापोटी पक्ष बदलणाऱ्यांच्या आणि त्यांना 'वॉशिंग मशीन'मध्ये स्वच्छ करणाऱ्यांच्या उद्योगातून पहातच असतो. लोकप्रतिनिधी म्हणवून घेणाऱ्यांना पक्ष-तत्त्व-विचारनिष्ठेप्रमाणेच सामाजिक बांधिलकीही राहिली नसल्याने त्यांचा 'इंडेक्स' घरंगळत कोणत्या गटारापर्यंत पोहोचलाय, ते जनतेला पक्के ठाऊक आहे.

मंत्रिमंडळ आणि प्रशासकीय व्यवस्था मिळून सरकार-शासन तयार होतं. म्हणजे कार्यपालिका. हा लोकशाहीचा प्रत्यक्ष कारभार चालवणारा स्तंभ आहे. त्याचा कारभार कसा चाललाय. 'मोदी सरकार' आणि त्यांच्या वळचणीला असलेली 'डबल इंजिन'वाली राज्यांची सरकारं; निवडणुकांच्या तोंडावर एका पाठोपाठ एक योजना जाहीर करतात. महाराष्ट्रात दरमहा १,५०० रुपयेवाली 'लाडकी बहीण'ची योजना जोरदार चर्चेत आहे. सरकार कितीही लोककल्याणकारी योजना जाहीर करीत असले, तरी प्रत्यक्षात ते आपले धार्मिक अजेंडा राबवित आहे. हिंदू-मुस्लीम द्वेष-तणाव वाढवण्यासाठी '३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष' निमित्ताने लंडनच्या म्युझियममधून औरंगजेबाचा कोथळा काढणारी शिवरायांची कथित वाघनखं भाड्याने आणण्यात आली. बलात्काराच्या, खुनाच्या गुन्ह्याखाली भोंदू बुवा-साधू-संत जेलबंद होत असताना नाशिक-सिन्नर येथील महंत रामगिरी महाराज इ.स.६०० मधील पैगंबर महंमद यांच्या १२ पत्नींचे दाखले देत दंगलसदृश आंदोलन घडवून आणतो आणि महाराजांच्या केसालाही धक्का लागणार नाही अशी भाषा करीत तेव्हा मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे त्यांची पाठराखण करतात. त्याला समज देत नाहीत. हे कुठल्या 'लोककल्याणकारी सरकार'चे लक्षण आहे ?

नवी मुंबई, खारघर येथे (१६ एप्रिल २०२३) भरदुपारी 'द्वितीय बैठक स्वामी' अप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' देण्याच्या निमित्ताने 'महासत्संग' सोहळा झाला. हा शासकीय कार्यक्रम होता. तेव्हा झालेल्या चेंगराचेंगरीत १२ बैठक-दासांचा मृत्यू झाला. असाच प्रकार जुलै २०२४ मध्ये उत्तर प्रदेशात हाथरस येथे झाला. तिथे 'नारायण साकार' (म्हणजे विष्णू अवतारी) हरी भोले बाबाच्या सत्संगात झालेल्या चेंगराचेंगरीत १२२ लोक मृत्युमुखी पडले. त्यात महिला व लहान मुले यांची संख्या अधिक होती. हेच प्रयागराज येथील कुंभमेळ्यात झाले. सत्संगात, तीर्थस्थानात, यात्रा-जत्रात जे मेले, ते मोक्षाला गेले, अशा भावनेने सरकारही अशा दुर्घटनांकडे बघते. अशाप्रकारे, देशात मेंदूंचे दगड बनवण्याचे कारखाने जोरात सुरू आहेत; तर दुसरीकडे अर्थसंकल्पातील शिक्षणावरील खर्चाला कात्री लावली जात आहे.

२०१३च्या केंद्रीय अर्थसंकल्पात 'मनमोहन सिंग सरकार'ने शिक्षणासाठी ८० हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. ती २०२४ च्या अर्थसंकल्पात १ लाख २०० कोटी असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोठ्या कौतुकाने लोकसभेत सांगितले. रकमेत वाढ निश्चित झाली आहे. तथापि, २०१३ चा अर्थसंकल्प १६ लाख ६५ हजार कोटी रुपयांचा होता; तर २०२४ चा ४८ लाख २० हजार कोटी रुपयांचा आहे. १० वर्षांत ही वाढ तिप्पट झाली आहे. तशीच ती शिक्षणक्षेत्रातील खर्चावरील तरतुदीत दिसते का? तुलनात्मक दृष्टीने पाहता, २०१३ मध्ये एकूण अर्थसंकल्पातील ४.५५ टक्के रक्कम 'एज्युकेशन बजेट'साठी राखून ठेवण्यात आली होती. ती २०२४ च्या अर्थसंकल्पात २ टक्क्यांवर आली. २०२५ च्या अर्थसंकल्पात ती आणखी कमी होऊ घातलीय. ह्या कपातीतून गरिबांच्या मुलांना गरिबीतच खितपत ठेवण्यासाठी, त्यांना शिक्षणापासून ...पृष्ठ क्र. ६ वर

# ठाण्याचं 'वाटोळे' करणारे अनेक 'पाटोळे'सारखे भुजंग... ...पृष्ठ क्र. १ वरुन

आणि त्यातून अतिप्रचंड पैसा ओरपतातच आहेत.

**'विकासा'च्या नावाखाली हिरव्याकंच ठाण्याची सगळी हिरवाई नष्ट झाली...'तलावांचं शहर', असं अभिमानाने मिरवणाऱ्या ठाणे-शहरातले बरेच तलाव नाहिसे झाले वा आक्रसले, विहीरी बुजल्या, खाड्या कायमस्वरुपी प्रदूषित झाल्या, रस्त्यांची दुर्दशा, अस्वच्छतेचं आगर, पिण्याच्या पाण्याचं दुर्भिक्ष्य व टँकर-लॉबीकडून सततचा लुटीचा जाच...एक ना अनेक, अनर्थ घडत गेले आणि आजचा 'विकास', हा भविष्यातला 'विनाश' आहे...याचं साद्यंत उदाहरण म्हणून 'ठाणे-शहर' सामोरं येऊ लागलं.**

५०-६० वर्षांपूर्वी सारस्वतांचं असलेलं हे 'सुसंस्कृत' शहर...पहाता पहाता 'विकासा'च्या नावाखाली भाई, मर्मवीर, धर्मवीर, कर्मवीर, दादा, अण्णा, साहेब वगैरे वगैरे असंख्य स्थानिक-राजकारण्यांच्या कृपाशिर्वादाने 'रासवटां'चं शहर बनलं...आणि, शहरात हातपाय पसरुन बसलेल्या राजकारणी-बिगर राजकारणी गुन्हेगारांच्या खुनी-दहशतीमुळे शहराच्या मूळ निवासींना, 'जहर' बनत चाललेलं हे 'ठाणे-शहर', निमूटपणे पहाण्याखेरीज काही करता येणं, अशक्यप्राय बनत गेलं!

विजू नाटेकरांपासून जमील शेखपर्यंत अनेक लढवय्या कार्यकर्त्यांचे मुडदे पडले; तर, विक्रांत कर्णिकांसारख्यांवर जीवघेणे हल्ले झाले (ज्या गुन्ह्यातले मारेकरी माहित असूनही ठाणे-पोलिस, राजकीय-दबावाने त्यांना कधि पकडू शकले नाहीत)...त्यातूनच नाशिक, वर्धा, डोंबिवली, साताऱ्यापासून महाराष्ट्राच्याच नव्हे; तर, संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या गुंडपुंड राजकारण्यांनी शहराचा पूर्ण ताबा घेतला.

**'बांधकाम-उद्योग' आणि त्यातून साधकबाधक मार्गाने होणारी कल्पनातीत मोठी कमाई, ही सगळ्याच राजकारण्यांची व महापालिका अधिकाऱ्यांची लवकरच एक हुकमी 'लाईफलाईन'च बनून गेली!**

महापालिका होण्याअगोदर ठाण्यात वाडे, चाळी, बैठ्या चाळी, झोपडपट्ट्या यांचा बोलबाला होता; ज्यात भाडेकरु अल्पस्वल्प भाडे भरुन फारशा तणावाविना छान मस्तीत जगायचे. मात्र, १९७०च्या सुरुवातीपासून ठाणेकर-नागरिक एकत्र येऊन 'सोसायटी' स्थापन करु लागले, जमीन विकत घेऊन हक्काचं घर बांधू लागले...परंतु, हळूहळू या बांधकाम-उद्योगात 'बिल्डर-लॉबी'ने चंचूप्रवेश केला.

भारतभरातून येणाऱ्या लोंढ्यांमुळे वाढत्या लोकसंख्येची गरज म्हणून आणि 'स्केअर-फुटामाग'चे बक्कळ व बिनडोक हिशोब छान कळायला लागले म्हणून...राजकारणी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी 'गृहबांधणी' व्यवसायाला घाईघाईने 'उद्योगा'चा दर्जा दिला (लक्षात घ्या 'अन्न, वस्त्र, निवारा' या तीन मूलभूत गरजांपैकी एक 'निवारा' ही गरज असताना, हे आक्रित घडवलं गेलं). विशेष बाब म्हणजे, सुरुवातीच्या काळामध्ये एका कुटुंबाला एकच फ्लॅट घेता येण्याची तार्किकदृष्ट्या अतिशय सुसंगत अशी 'मर्यादा' होती; परंतु, नंतर ती जाणिवपूर्वक राजकीय-बदमाषीने काढून टाकण्यात आली!

त्यामुळे घरांकडे, सोन्यापेक्षाही बरकत आणणारी 'एक गुंतवणूक' किंवा 'रोज सोन्याचं अंड देणारी कोंबडी' म्हणून पाहण्यास सुरुवात झाली...घरांचा 'काळाबाजार' (Black Market) सुरु झाला. त्यातूनच पुढे घरांच्या किंमती आकाशाला भिडण्यास सुरुवात झाली. एखादा प्रकल्प सुरु झालं की, गरज असणाऱ्यांपेक्षा 'गुंतवणूक' म्हणून फ्लॅट घेणाऱ्यांचीच संख्या जास्त व्हायला लागली. आणि अर्थातच, त्यात मराठी राजकारणी-बाहुबलींना हाताशी धरुन आपल्या 'जमातीचं राजकारण' करणारे 'जैन-गुजू-मारवाडी', हेच प्रामुख्याने जास्त असतं व आजही आहेत. माणसांना घरं नाहीत आणि घरांना माणसं नाहीत असं व्यस्त-विपरीत समीकरण, अमानुष 'आर्थिक-विषमते'तून तयार होऊ लागलं!

कालांतराने हा एक फार मोठा किफायतशीर व करचोरी सहजी रिचवणारा 'व्यवसाय'च बनून गेला. 'काळ्या पैशा'ने कूस बदलली व तो हिरेमाणके, सोनं, शेअर्स, चलनी-नोटांपेक्षा जास्त...'काँक्रिट'च्या भक्कम आश्रयाने वस्ती ठोकून राहू लागला.

काळाची पावलं अचूक व वेळीच ओळखून 'जैन-गुजू-मारवाडी' व्यावसायिक (ज्यांच्याकडे, मराठी-लोकांच्या तुलनेत, इतर व्यवसायातला प्रचंड काळा पैसा, आयता 'बीज-भांडवल' म्हणून हाती होताच), जे एकदा त्या बांधकाम-व्यवसायात आत घुसले, ते आरपार घुसलेच. **शहरातल्या स्थानिक राजकारण्यांना प्रचंड पैसा पुरवून, पुढच्या उण्यापुऱ्या काही दशकांतच त्यांनी शहरातल्या 'मोक्याच्या आणि माऱ्या'च्या सगळ्या जागा, आपल्या व आपल्या जमातीच्या ताब्यात व ताफ्यात जमा केल्या. राज्य उभारणीसाठी व संरक्षणासाठी गडावरच्या अचूक 'माऱ्या'च्या जागा ताब्यात ठेवा असं, शिवछत्रपती; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकून 'मोक्या'च्या जागा काबीज करा, असं सांगून गेले. पण, आम्ही काय केलं; तर, मुखातून शिवछत्रपतींचं व बाबासाहेबांचं नाव घेत, त्यांच्या नावाने फुकाचं व फसवं राजकारण! त्यातून, आमच्या हातून 'उलटा व्यवहार' घडला व 'जैन-गुजू-मारवाड्यां'च्या ताब्यात, शहरातल्या 'मोक्याच्या आणि माऱ्या'च्या जागा, आम्ही त्यांना 'आंदण' म्हणून दिल्या...बदल्यात टक्केवारीतून अफाट 'काळी माया' गोळा करत, स्थानिक राजकारणी रातोरात मोठे व्हायला लागले. ते मोठे होत गेले आणि मराठी-घरं छोटी छोटी होत गेली!** चॉईस दिला तर, कोंबडी-कुत्री पण रहाणार नाहीत; अशा १० × १० चौरसफुटाच्या विविध नगरांमधील कोंडवाड्यात गर्दी-गिचमिटीत रहायला लागली...पण, सत्यनारायणाच्या रोजच्या ढीगभर पूजा, गणपती, दहीहंड्या, गरबे, भंडारे असे राजकारण्यांनी पोसलेले 'सार्वजनिक-उत्सव' मात्र, 'मतांचे हमखास अड्डे' (Vote Banks) म्हणून मोठे होत गेले.

...म्हणूनच, किमान आतातरी देवादिकांमध्ये, धर्मसंप्रदायांमध्ये व फाजील-उत्सवप्रियतेत पूर्ण अडकलेल्या व हताश-वैफल्यग्रस्त झालेल्या सामान्य मराठी-माणसाला 'धर्मराज्य पक्षा'च्या शहरं-उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे जास्तीतजास्त 'एक दुकान, एक मकान' या धोरणाचं क्रांतिकारी महत्त्वं पटावं! **मराठी-माणसाच्या जगण्याची कोंडी फोडणाऱ्या या 'संपत्तीचं फेरवाटप' करण्याच्या धोरणाकडे, जर मराठी-माणूस दुर्लक्ष करेल; तर, स्वतःच्या हाताने आपल्या पुढील पिढ्यांच्या भविष्याची राखरांगोळी करुन ठेवेल. मग, त्या राख-रांगोळीच्या रेखाटनातूनच भविष्यातील मराठी-दिवाळ्या त्याला साजऱ्या कराव्या लागतील; कारण, दिवसागणिक 'महाग' होत जाणाऱ्या 'शहरांनी व शहरातल्या घरांनी', आपलं 'दिवाळं' तेव्हा वाजवलेलं असेल...जेव्हा, लक्ष्मीपूजनाला बाहेर, धनदांडग्या गुजूंचे कानठळ्या बसवणारे फटाके वाजत असतील!**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## संघ-जनसंघ ते भाजप : व्होटचोरीचा प्रवास ...पृष्ठ क्र. ५ वरुन

वंचित ठेवण्याचा 'राष्ट्रीय कट' फत्ते केला जातोय, असे का म्हणू नये? का, ह्याला लक्ष्मीला मांडीवर खेळवण्यासाठी, सरस्वतीचा मोरासह गळाघोट करून, तिला लंकेची पार्वती करण्याचा विष्णू अवताऱ्यांचा 'खुनशी डाव' म्हणायचा ?

ह्या विष्णू अवतारमूर्तींचा आणखी एक चमत्कार पहा. अदानी-अंबानी सारख्या लक्ष्मीधरांचे दोस्त असणाऱ्या या विष्णू अवतारींच्या सरकारने २०१४ ते २०२४ ह्या १० वर्षांत 'वर्ल्ड बँक' व 'जागतिक नाणे निधी' या आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून १२० लाख कोटी रुपयांचे कर्ज घेतलेय ! २०२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशावरील कर्जाची रक्कम २०५ लाख कोटी रुपये इतकी दाखवली होती. इतके कर्जबाजारी होऊनही देशातल्या १४० कोटी लोकसंख्येपैकी ८५ कोटी जनता दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतेय. ती हक्कासाठी पेटून उठू नये, याकरिता त्यांना मोफत धान्याची लालूच चारली जाते आणि त्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्यांना 'शहरी नक्षलवादी-माओवादी' ठरवून तुरुंगात डांबलं जातंय.

सरसंघचालक आता देशाच्या आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशीच्या बाता मारतात. यापूर्वीही संघप्रणीत संघटनांनी 'स्वदेशी जागरण'च्या नावाने बरीच घसाफोड केली होती. पण, परदेशी आयात-निर्यातीची स्थिती काय आहे? ही स्थिती २०२४ मध्ये ३४ बिलियन डॉलर निर्यात आणि ५८ बिलियन डॉलर आयात अशी होती. म्हणजे, भारत २४ बिलियन डॉलर्सच्या तोट्यात आहे आणि ५८ बिलियन डॉलर्सच्या परदेशी मालावर अवलंबून आहे. हे 'आत्मनिर्भर भारत'चे वर्तमान असताना, २०४७ मध्ये देश 'विकसित भारत' होईल, यावर विश्वास का ठेवायचा? या प्रश्नाचं उत्तर देशातल्या जनतेनं २०२४च्या लोकसभा निवडणुकीत दिलंच आहे. 'भाजप'च्या बहुमताचा पारा त्या निवडणुकीत मोठ्याप्रमाणावर 'मतचोरी' (राहुल गांधींना त्यामुळेच व्होट चोर, गद्दी छोड आंदोलन पूकारावं लागलंय) होऊनही उतरवलेला आहे. त्यानंतरच्या हरणाऱ्या, महाराष्ट्र व कर्नाटकच्या निवडणुकांत देखील EVM द्वारेच भरभक्कम यशाची करामत केली गेली. त्याच्या सुरस-चमत्कारिक कथा एकेक करीत जाहीर होत आहेत. हा 'रा. स्व.संघा'च्या राजकीय शाखेने सत्तेच्या जोरावर केलेला पराक्रम आहे. तो संघाची शान वाढवणारा नक्कीच नाही. त्यात सत्यशील, एकवचनी राम नाही!

...त्यामुळे संघाला आपल्या शताब्दी सोहळ्यातही रावण दर्शन घडविण्याशिवाय पर्याय शिल्लक राहिलेला नव्हता!

# शीर्षक सुचेना

*इथे कवट्या मिळतील. ५०० पाउंडांपासून किमती आहेत.*
*इथे माणसांचे दात मिळतील. ८ पाउंडांपासून किमती सुरु होतात.*
*इथे माणसाचा पूर्ण सांगाडा मिळेल. १००० पाउंड किंमत पडेल.*
*माणसांच्या पायाची हाडं, मनगटाची हाडही इथे मिळतील. बोटंही मिळतील.*

इसेक्स (इंग्लंड) या शहरात 'क्युरियॉसिटी फ्रॉम फिफ्थ कॉर्नर' या एका दुकानाबाहेर वरील पाटी लावलेली आहे.

नाना प्रकारच्या कवट्या कपाटातल्या काचेमागं या दुकानात दिसतील. ओळखताही येणार नाहीत असे प्राण्यांचे हाडांचे सांगाडेही तिथं टेबलावर विकायला ठेवलेले दिसतील. म्युटेशन होऊन किंवा संकर होऊन मिश्र प्राणी तयार होतात, त्यांचे सांगाडे इथे तपशीलवार वर्णनासह ठेवलेले दिसतील.

टेबलावर एक काचेचं भांडं दिसेल. त्यात मॉर्फिनसारखं काही तरी द्रव्य आहे आणि त्यात मुठीच्या आकाराची दोन बाळं एकमेकाला चिकटलेली दिसतील. गर्भात ती एकमेकाला चिकटली होती, तशीच ती बाहेर आली.

एका वाडग्यात दात दिसतील.

माणसांचे अख्खे सापळे इथे भिंतिला टेकून उभे असलेले दिसतील.

हेन्री स्क्रॅग हा मालक दुकानात तुमचं स्वागत करेल. जटा झालेले केस. लांब अव्यवस्थित गुंता झालेली दाढी. कित्येक दिवस न धुतलेले कपडे. मळलेली, आकार हरवलेली बौलर हॅट.

दुकान एकोणिसाव्या शतकातलं आहे असं वाटतं, पण दुकान एकविसाव्या शतकातलंच आहे. गेल्या आठ दहा वर्षातलं.

हेन्री हा मुळात शेतकरी. एके दिवशी त्यानं वर्तमानपत्रात जाहिरात वाचली–कवट्या विकत मिळतील. हेन्रीनं मागणी नोंदवली. एके दिवशी दुपारी त्याच्या दारात एक खोका येऊन पडला. त्यात १२ कवट्या होत्या. भंकस म्हणून मागवलेल्या या कवट्यांचं करायचं काय? हेन्रीनं दुकान काढायचं ठरवलं. ही त्याच्या व्यवसायाची सुरवात.

म्युझियमना सांगाडे हवे असतात. मेडिकल कॉलेजमधे ॲनाटॉमी शिकवण्यासाठी सांगाडे आणि हाडं हवी असतात. हेन्री ती पुरवू लागला. सांगाडे आणि हाडे तो विकत घेऊ लागला.

हेन्री सांगाडे विकतोय असं म्हटल्यावर लोक सांगाडे घेऊन येऊ लागलं. सांगाडे कुठून आणलेत याची चौकशी हेन्री करत



नसे. बातम्या येऊ लागल्या की, चर्चच्या प्रांगणातल्या कबरीतली प्रेतं नाहिशी होऊ लागलीत. एका चर्चमधे सांगाडे, कवट्या इत्यादी गोष्टी जपून ठेवल्या होत्या. दरोडेखोरांनी कवट्या आणि हाडं पळवली. पोलीस तपास करू लागले. पोलिस हेन्रीच्या दुकानात पोहोचले. हेन्रीचं म्हणणं होतं की नवी घरं बांधताना पायासाठी जमिनी खोदतात, त्यात सांगाडे सापडतात.

दोन गोष्टी समांतर घडू लागल्या होत्या. हेन्री कवट्या विकत होता आणि कवटी ही एक शोभेची वस्तू म्हणून कपाटात ठेवायची फॅशन सुरु झाली होती. वरून सर्व कवट्या सारख्याच दिसतात. पण प्रत्येक कवटी वेगळी असते. एखादी कवटी सुंदर स्त्रीची असू शकते, एखादी कवटी बलदंड माणसाची असू शकते. काय असेल ते असेल. माणसं दुकानात जाऊन चांगल्या आकाराचे आंबे निवडावेत तसं कवट्या निवडू लागले.

वस्तूंची किमत केव्हां वाढते? जेव्हां वस्तू दुर्मिळ असते, तिच्यात काही तरी विशेष वेगळेपण असतं. हेन्रीनं दुकानात एक कवटी ठेवली. त्या कवटीला एक मोठं भोक होतं. हेन्रीचं म्हणणं असं की हजारो वर्षांपूर्वी माणसानं एक वैद्यकशास्त्र विकसित केलं होतं. व्याधी दूर करण्यासाठी माणसाच्या कवटीला छिद्र पाडून आत औषधं सरकवत किंवा शस्त्रक्रिया करत. तसं त्यानं कुठं तरी वाचलं होतं. ही कवटी त्या काळातली होती असं हेन्रीचं म्हणणं.

त्या कवटीवर हेन्रीनं किमतीचं लेबल लावलं नाही. कवटीचा लिलाव होणार. कोणीतरी धनाढ्य माणूस ती कवटी पाच पंचवीस करोड देऊन विकत घेणार. पाच पन्नास करोड रुपये खर्च करून खरीदलेल्या पेंटिंगच्या शेजारी तो ही कवटी खुंटीवर टांगणार. येणाऱ्या जाणाऱ्याला कौतुकानं या कवटीचं वैशिष्ट्यं सांगणार. ही कवटी कोणी चोरू नये यासाठी कॅमेरा लावणार आणि चार दोन सशस्त्र पहारेकरी संरक्षणासाठी बसवणार.

हेन्रीकडं आणखी एक कवटी होती. या कवटीच्या डोळ्यांच्या खाचेत कवड्या होत्या आणि नाकाच्या पोकळीत धातुची वळी होती. हेन्रीचं म्हणणं असं की ही कवटी म्हणजे एका नायजेरियन जमातीत वापरली जाणारी हॅट आहे, फेटा किंवा टोपी आहे. त्या जमातीत कवड्या मौल्यवान आणि भाग्यवान मानल्या जातात, म्हणून त्या कवटीच्या खाचेत ठेवलेल्या आहेत; नायजेरियन जमातीतले प्रतिष्ठित लोक विशेष प्रसंगी, समारंभात ही कवटीहॅट वापरतात.

हेन्रीचा वेबसाईट आहे. त्यावर ही हॅट परवा–परवा पर्यंत दिसत होती. तिचाही लिलाव होणार आहे. या हॅटचा एकूण सांस्कृतीक इतिहास पहाता धनाढ्यातले वरचढ धनाढ्य ही हॅट विकत घेतील. काही दिवसांनी गौतम अदानी ही हॅट घालून अनंत अंबानीच्या वनतारात नवीन हत्तींचं स्वागत करण्यासाठी जातील.

कबरीतून बाहेर काढलेल्या प्रेतांचे दात, ही गोष्टही आता मौल्यवान झालीय. दातांची पेंडंट, दातांच्या माळांची फॅशन काही दिवसांनी सुरु होईल यात शंका नाही. क्लिओपात्राचे दात कोणाला तरी मिळतील, मेरिलिन मन्रोचे दात कोणी तरी हुडकून काढेल. निदान तसा दावा तरी करेल. मग काय विचारता. क्लिओपात्रा दंत गळेहार, किमत नऊशे करोड डॉलर वगैरे.

हेन्रीचं दुकान अगदीच झ्यांगड आहे. अमेरिकेत अनेक शहरांत हाडं, कवट्या विकणारी पॉश दुकानं उभी राहिलीत. करोडो डॉलरचा धंदा ही दुकानं करतात.

टक्कल पडलेला माणूस कंगवा विकत घेतो, तोंडाचं बोळकं झालेला माणूस टूथपेस्ट विकत घेतो, एस्किमो फ्रीज विकत घेतो, आंधळा चष्मा विकत घेतो.

वस्तूचं बाजारातलं मोल वाढवण्याची कला म्हणजे मार्केटिंग.

हा लेख लिहिला खरा. पण त्याला शीर्षक काय द्यावं ते सुचेना. वाचकांनीच शीर्षक सुचवावं.

निळू दामले यांचे ब्लॉग वाचण्यासाठी niludamle.com वर जावे.

## मुंबईच्या भविष्यकालीन नियोजनाचे दिशादर्शन' एक नेता आणि पाच अधिकारी अशी ही सहा मंडळी करणार आहेत, हे पहिलं विशेष!

डॉ. अभिजीत बांगर सोडल्यास यात एकही मराठी व्यक्ती नाही, हे आणखी एक विशेष! वाहतूक, घरबांधणी, रस्ते आणि पायाभूत सुविधा यावरील सरकारी धोरणांचा ही मंडळी उहापोह करणार आहेत, असं बातमीत म्हटलंय. म्हणजे सरकारी धोरणांची माहिती देण्यासाठी शासकीय सुविधा अपुऱ्या पडत असाव्यात म्हणून ही परिषद, हे सर्वात विशेष!

आणि याला 'लोकमान्य'ता मिळवून द्यायचं काम लोकसत्ता स्वत:हून करतंय, हे सर्वात जास्त (आत दडलेलं) विशेष!

सरकारी विभागांकडून प्रायोजकत्व घेवून पुन्हा सरकारी अधिकाऱ्यांना बोलायला लावायचं आणि ते आपल्या बॅनरखाली करायचं. हे म्हणजे 'अधांतर' मधला नरू म्हणतो तसं, ह्याची खोली त्याला द्यायची, मधली दलाली आपण घ्यायची, बस्स! शिवाय त्या दलालीच्या नावाखाली 'मुंबईच्या भविष्याची काळजी वाहिली', हा ऑरगॅझम मिळत असेल तर अहाहा!

त्यापेक्षा कॅडबरीची जाहिरात घेवून स्वत:च्या वर्तमानपत्राचे नाव The Meetha Of India अशी जाहिरात करणारा टाईम्स ऑफ इंडिया मला जास्त व्यावसायिक वाटतो. उगीच कुंकू एकाचं लावायचं आणि शय्यासोबत दुसरीकडे करायची असली भानगडच नाही.

आणि या सगळ्या परिषदेला आपल्या विश्वगुरुंच्या पठडीतील त्यांनाच आवडेल असं ठेवणीतलं गोंडस 'मुंबई २०४७' असं नाव द्यायचं, हे तर अती उच्चविशेष. म्हणजे देवेंद्रही खूष आणि नरेंद्रही खूष!

– *आनंद भंडारे*, सोळा दाहे पंचवीस

# संघ : सत्तेचा गुलाम, सत्याचा दुष्मन

मोहन भागवत 'रा. स्व. संघा'चे 'सरसंघचालक' झाल्यापासून संघ- भाजप परिवारच्या दुर्व्यवहारात मुबलक वाढविस्तार झालाय. केरळमधील तरुण आयआयटीयन स्वयंसेवकांची आत्महत्या ही त्याचीच साक्ष आहे.

**२०१४** च्या लोकसभा निवडणुकीत 'भाजप' व मित्रपक्षांचे (NDA) सरकार देशात आले, नरेंद्र मोदी प्रधानमंत्री झाले; तेव्हा एक हजार वर्षांनी आम्ही सत्तेवर आलो, असे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले होते. बौद्धिक सम्राटांनी आपल्या अकलेची तार इतक्या जोरात लावल्यावर वाचाळ अभिनेत्री कंगना राणावत भारत देश २०१४ ला स्वतंत्र झाला, असे म्हणणारच ! या स्वातंत्र्याचा लाभ घेण्यासाठी 'रा.स्व.संघ' आणि परिवारातल्या संस्था-संघटना समाजकार्याचा देखावा बंद करून निवडणुका आणि मोदी-शहा यांनी नेमून दिलेल्या 'भाजप'च्या प्रचारार्थ गेली ११ वर्षे राब राब राबत आहेत. **'रा.स्व. संघा'सह परिवारातील संघ संस्था-संघटनांच्या पदाधिकारी आणि प्रचाराकांच्या नियुक्त्या; प्रधानमंत्री कार्यालयाच्या (PMO) नजरेखालून व्हाव्यात; इतकी शरणागती संघ आणि पारिवारिक संस्था-संघटनांनी मोदी-शहा यांच्या चरणी अर्पण केलीय! ह्या संस्था-संघटना कधिही हिंदुधर्मातील मुख्य विचारधारेच्या नव्हत्या. त्यामुळेच २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर 'कॉंग्रेस'च्या राहुल गांधी यांनी देशव्यापी 'भारत जोडो यात्रा' (२०२२) काढली असता; त्यास सर्व शंकराचार्यांनी आणि साधू- संत-महंतांनी शुभाशीर्वाद दिले** ! याउलट, अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिराच्या उद्घाटनाला चारही शंकराचार्यांनी अनुपस्थितीत राहून आपली नाराजी व्यक्त केली. या दोन्हींतून त्यांनी विश्वबंधुत्व आणि उच्च संस्कार-नीतीसाठी जगविख्यात असलेला हिंदूधर्म; हा धार्मिक द्वेष पसरविण्याऱ्या गोळवलकरी, सावरकरी, गोडसेवादी हिंदुत्वापेक्षा वेगळा आहे; तो सत्तास्वार्थासाठी वापरणे मंजूर नसल्याचे दाखवून दिलंय. **हिंदुधर्माने विभिन्न मते, विचार, पंथ-संप्रदाय यांना आपल्यात सामावून घेतलंय. आचार्य चार्वाक यांच्या नास्तिकवादालाही षड्दर्शनात स्थान दिलंय. 'समग्रता' हे हिंदुधर्माचे 'संचित' आहे. त्यालाच सुरुंग लावण्याचे काम, 'भाजप-संघ परिवार' २०१४ पासून केंद्र सत्तेच्या माध्यमातून करीत आहे- हे हिंदुधर्म विरोधी 'कथित' हिंदुत्व मुख्यधारेच्या हिंदुधर्मात घुसवण्याचा हरामी विचार, 'रा.स्व.संघा'च्या व्यवहारात कसा आला?**

२००२ पासून, गुजरातपाठोपाठ उत्तर प्रदेश या राज्याला 'हिंदुत्वाची प्रयोगशाळा' करण्याचा निर्णय, हा संघाचा होता. तसाच, संसारसुखाच्या त्यागाचे प्रतीक असलेली भगवी-वस्त्रे परिधान करणाऱ्या योगी आदित्यनाथ यांना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री करणे; आणि हयात पत्नीचा त्याग करून 'विश्वगुरू' होऊ पाहाणाऱ्या नरेंद्र मोदी यांना 'प्रधानमंत्री' करणे; हा निर्णयही 'रा.स्व.संघा'चाच होता. त्यात २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर अमित शहा यांच्या 'केंद्रीय गृहमंत्री'पदाची भर टाकण्यात आली. तथापि, ह्या त्रिफळांनी संघाने लोकांना भ्रमित करण्यासाठी पेरलेल्या 'हिंदूराष्ट्र' निर्माणाच्या उद्दिष्टांचे चूर्ण कले; आणि भारताची 'व्यापारी राष्ट्र' अशी ओळख करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली. त्यासाठी मोदी-शहा यांनी वर्ण्यश्रेष्ठत्व मानणाऱ्या 'रा.स्व. संघ' व पारिवारिक संस्था-संघटनांना सरकारी निधी, योजना, कॉर्पोरेट कंपन्यांच्या CSR फंडांचा चारापाणी देऊन आपले 'आर्थिक-गुलाम' केले आहे. त्यांना गुलामीची जाणीव होऊ नये, यासाठी 'मोदी सरकार'ने जुलै २०२४ मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांवरचा 'रा.स्व.संघा'च्या कार्यक्रमात-उपक्रमांत सहभागी न होण्याचा प्रतिबंध हटवला आहे !

महात्मा गांधी हत्ये (३० जाने. १९४८) संबंधित कारस्थानाच्या संशयाखाली तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी 'रा.स्व. संघा'वर बंदी घातली होती. ती सहा महिन्यांनंतर थोडी थोडी करीत शिथिल करण्यात आली. ह्याच काळात संघ, वेगवेगळ्या संस्था-संघटना स्थापून टिकून राहिला. १९५२ च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत 'जनसंघ' निर्माण झाला. दरम्यान, संघकार्य सुरु झाले. परंतु देशात आणि राज्यात बहुतांश 'कॉंग्रेस'ची सरकार असल्याने सरकारी कर्मचारी उघडपणे संघकाऱ्यात सहभागी होत नसत. परंतु, त्यांचा छुपा सहभाग लक्षात आल्याने १९६६, १९७० आणि १९८० मध्ये 'केंद्र सरकार'ने संघकार्य सहभागाला प्रतिबंध घालणारा आदेश जारी केला. तो राज्य कर्मचाऱ्यांनाही लागू होता. तो प्रतिबंध रद्द करण्याची सुबुद्धी १९९८ ते २००४ या वर्षांत 'वाजपेयी सरकार'ला; आणि २०१४ ते २४ ह्या दहा वर्षांत 'मोदी सरकारला' झाली नाही. कारण या १६ वर्षांत कुठल्या नेत्याने वा पक्षाने 'रा.स्व.संघा'ला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले नव्हते. ते **राहुल गांधी यांनी २०२४च्या लोकसभा निवडणूक प्रचारात आणि त्यानंतर लोकसभेत केलेल्या भाषणातून केले. त्यांनी संघाच्या स्वार्थी हिंदुत्वाचा आणि नकली सांस्कृतिक राष्ट्रवादाचा बुरखा टराटरा फाडला. 'नफरत छोडो' आणि 'डरो मत' हा अस्सल हिंदुत्वाचा संदेश राहुल गांधींनी सांगितला. तो जनतेला पटला; म्हणून 'भाजप'ची '४०० पार'ची घमेंड २४० खासदारांवर उतरली. तसेच, राहुल गांधींच्या 'कॉंग्रेस' व इतर 'भाजप' विरोधी पक्षांनी केलेली 'जातीनिहाय जनगणना; त्यानुसार सत्तेसह सर्व क्षेत्रात 'हिस्सा समान' ही मागणी 'रा.स्व.संघा'च्या १०० वर्षांच्या अस्तित्वावर मात करणारी ठरली आहे.**

'मोदी सरकार'ची तिसरी टर्म ही, बिहारचे नितीशकुमार आणि आंध्रचे चंद्राबाबू नायडू यांच्या पक्ष-खासदारांच्या टेकूवर उभी आहे. हे दोन्ही पक्षनेते जातीनिहाय जनगणनासाठी आग्रही आहेत. अशी 'जनगणना' नितीशकुमार यांनी यापूर्वीच बिहारात केली होती. हे वास्तव लक्षात घेऊन सरसंचालक मोहन भागवत यांनी जातीनिहाय जनगणनेला (तिच्या आकडेवारीचा वापर राजकारणासाठी करू नये, या अपेक्षेने) मान्यता दिली आहे. त्यासाठी झालेल्या देवाण-घेवाणीत सरकारी कर्मचाऱ्यांची 'संघ बंदी' रद्द करण्याचा निर्णय झाला असावा. हा निर्णय लोकशाहीला साजेसा आहे. तथापि, तो संघाचे 'सरकारीकरण' झाल्याची साक्ष देणारा आहे. आता सरकारी कर्मचारी 'रा.स्व. संघा'च्या शाखेत राष्ट्रवादाचे प्रशिक्षण घेऊ शकतात. या निर्णयाचे कौतुक करताना राज्यसभेचे तेव्हाचे सभापती (उपराष्ट्रपती) जगदीप धनखर म्हणाले, सरकारी कर्मचारी आता संघाची दीक्षा घेऊन तपस्वी होऊ शकतात ! अशा तपस्वींना आता संघकार्य उघडपणे करता येईल. ह्यालाच रा. स्व. संघ शताब्दीची फलश्रुती म्हटली पाहिजे.

असो. **२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत 'भाजप' प्रभावी केंद्र सरकार सत्तेवर आल्यापासून देशात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रातील उलाढालीत हिंदूंची आणि हिंदूधर्माची कमालीची वाताहत झाली आहे. क्रांती कोणतीही असो; ती आपलीच पिल्ले खाते. ह्या खादाडीत संघाचीही फरपट झाल्याने; सरसंघचालकांना कशा वैचारिक माकडउड्या माराव्या लागल्यात. त्यात ते आता भलतेच कुशल झालेत.**

संघकार्य-व्यवहाराबद्दल पूर्वी कुणी काही लिहिलं-बोललं की, त्यांना संघ काळला नाही, असे संघ कारभारी म्हणत. तथापि, सत्तेची जादू आगळी असते. सत्ता कुणाला फसवत नाही की; नादाला लावत नाही. तर, तुम्ही जसे असाल, तसे करण्यास ती तुम्हाला भाग पाडते. जनतेला तुमचे खरे रूप दाखवते. तुम्ही खरे असाल, तर खरे दिसाल; खोटे असाल तर खोटे दिसाल. इतकीच सत्तेची ताकद असते. **सत्ता सत्य दाखवते. संघ स्वयंसेवक- प्रचारक नरेंद्र मोदी सलग तीनदा देशाचे 'प्रधानमंत्री' झाले. अनेकजण 'मुख्यमंत्री'-मंत्री झाले. पण त्यांच्या सहवासात 'रा.स्व.संघ' परिवारासह सत्तेचा गुलाम आणि सत्याचा दुष्मन झाला! हा दुर्व्यवहार मोहन भागवत 'सरसंघचालक' झाल्यावर अधिक झाला. केरळमधील तरुण आयआयटीयन स्वयंसेवकाची आत्महत्या, ही त्याचीच साक्ष आहे.**

**हा सव्वीस वर्षांचा तरुण; पालकांच्या आज्ञेनुसार लहानपणापासून संघाच्या शाखेत जात होता. संघकार्यात सहभागी होत होता. वयात येत असतानाच तो 'रा.स्व.संघा'तल्या वरिष्ठांच्या लैंगिक वासनेची शिकार झाला. शिकाऱ्यांच्या संख्येत वाढ होत होती. (हाही संघ परिवाराच्या 'कुजबुज' तंत्राचा परिणाम असावा) हा वरिष्ठांचा लैंगिक-अत्याचार तो सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशा कोंडीत दहा वर्षे भोगत होता.** असह्य झाले तेव्हा त्याने आत्महत्या केली. तत्पूर्वी, त्याने जे भोगलं, ते सोशल मिडियातून तपशीलवार शेड्यूल करुन ठेवलं होतं...ते जाहीर झाले. त्यात त्याने आपल्या मुलांना संघात पाठवू नका; संघ प्रचारक व स्वयंसेवकाशी दोस्ती ठेवू नका, असे म्हटलंय. यावर प्रकरणावर संघ- भाजप परिवार आणि अंधभक्तांची अळीमिळी गुपचिळी अशी दातखीळ बसलेली असेल. कारण, इतके दिवस संघ वरिष्ठांचा झाकून राहिलेला वासनांध-गाढवपणा जगजाहीर झाला आणि कथित ...पृष्ठ क्र. १० वर

# सौ सुनार की, एक 'धर्मराज्य' की.....

...पृष्ठ क्र. १ वरुन

ही, नरेचि हीन केला किती नर, अशी झालेली असल्याने... डॉ. दत्ता सामंतांसारख्या सामर्थ्यशाली व लढवय्या कामगार-नेत्याची भांडवली-व्यवस्थेनं निर्घृण हत्या घडवल्यानंतर, पोरकी झालेल्या व एकाकी पडलेल्या 'कामगार-चळवळी'ला एक हाती सावरुन जर कोणी धरलं असेल; तर, ते आमच्या भाईंनीच!

हा आमचा 'भाई' म्हणजे, गुंडागर्दी करणारा तसा, कुठला आवारा प्रस्थापित-राजकारणी 'भाई' नव्हे; तर, ज्या प्रेमाने व अदबीने डाव्या चळवळीतील कार्यकर्ते 'कॉम्रेड' वा 'साथी' असं, एकमेकाप्रति संबोधन करतात...तसंच, किंवा त्याही पलिकडचं प्रेमादराचं व हक्काचं संबोधन होय.

डॉक्टरांच्या पश्चात कोसळू पहाणाऱ्या कामगार-चळवळीला आमचे भाई, 'राजन राजे' यांनीच पुढे होत, खंबीर हात दिला व त्या एकखांबी तंबूवर, महाराष्ट्रातली समस्त कामगार-चळवळ आजवर तग धरुन उभी आहे (जिथे, आम ची 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाची युनियन नाही... तिथेही, अनेक युनियन कमिट्या 'चालूगिरी' करत, राजन राजे यांची 'धर्मराज्य' युनियन आणतो; असं व्यवस्थापनाला 'ब्लॅकमेल' करत मोठे करार करवून घेतात), असं कुणी म्हटलं तर, वावगं ठरु नये.

**आम्हाला स्मरतं की, प्रिमियम-ऑटोमोबाईलच्या लढ्यात, डॉ. दत्ता सामंत धडाधड एकापाठोपाठ एक मोठमोठ्या पगार / बोनस वाढीचे दणके देत असताना...प्रिमियर-कंपनीच्या गेटवर एका स्टुलावरुन कामगारांसमोर भाषण करत असताना डॉक्टर मोठ्या अभिमानाने म्हणाले होते की, आज माझा प्रिमियरचा साफसफाई करणारा कामगार, भारताच्या राष्ट्रपतींपेक्षा मोठा पगार घेतोय (तेव्हा, राष्ट्रपतींचा पगार दरमहा रु.१०,०००/- होता); याचा मला ऊरभरला आनंद आहे! काळाने कूस बदलली...डॉक्टरांच्या जागी, आम चे 'भाई' आले आणि 'सिम सिम खुल जा' असा काम गार-कर्मचारीवर्गाच्या आर्थिक-उन्नयनाचा, जगन्नाथाचा रथ पुन्हा मार्गस्थ झाला!**

...आणि, छोट्यामोठ्या कंपन्यापासून अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये 'सहा आकडी' (म्हणजे, लाखाहून अधिक रकमेचे) पगार व बोनसचे आकडे दिवाळीतल्या रॉकेटसारखे अस्मानावेरी उसळू लागले.

...मात्र, त्यानंतरच्या काळात, कामगारहितविरोधी अशा दोन अघटित घटना घडल्या... एक म्हणजे, सगळ्या 'भांडवली-व्यवस्थेनं एकत्रित येत कामगार-चळवळीवर 'कंत्राटी-कामगार पद्धती'चा हल्लाबोल केला; त्यामुळे, राजकीय-ताकदी अभावी महाराष्ट्रातल्या औद्योगिक व सेवा क्षेत्रात 'गुलामगिरी'चं धुमशान घालणाऱ्या, या कंत्राटी-अवदसेला रोखणं अशक्यप्राय बनत गेलं (तरीही, 'धर्मराज्य'ने शून्य राजकीय-ताकद असतानाही शर्थीने प्राणांतिक झुंज देत, आपल्या प्रभावक्षेत्रातून, या अवदसेला शिरकाव करु दिला नाहीच) आणि दुसरं म्हणजे...जो 'राजन राजे' यांनी स्वहस्ते उभारलेला 'बालेकिल्ला' भारतभरच नव्हे; तर, जगभर गाजत होता...त्यालाही काही नतद्रष्ट, नीच-अधम प्रवृत्तींची नजर लागली...आणि, तो 'सुल्झर पंप्स' नवी मुंबई, दिघा या कंपनीतील आमच्या भाईंचा कामगारहिताचा सत्याचा प्रयोग एका मोठ्या धर्मसंकटात व चोर-दरोडेखोर-लुटेऱ्यांच्या घेऱ्यात सापडला!

...अशा विपरीत स्थितीतही, आम्हाला कळविण्यास अतिशय अभिमान व आनंद होतोय की, या वर्षे-२०२५च्या दिपावलीत आमच्या 'धर्मराज्य'कडील किमानपक्षी तीन कंपन्यांमध्ये....

१) इडिकॉन कंपनी (रबाळे),
२) हिवा-इंडिया (महापे)
३) प्रोटेगो इंडिया (रबाळे)

**'सहा आकडी' म्हणजे, एक लाखाहून अधिक रकमेचा 'बोनस' संबंधित कामगारांना मिळवून देण्यात आलेला आहे!**

**ॲपकोटेक्स, वॉलमेट, शेरॉन बायोमेडिसीन, जॉन्सन-मॅथ्यू, उळढ-अँथिया (रोहा)...यासारख्या अनेक कंपन्या, त्याच पद्धतीने प्रगतीपथावर आहेत व त्याही, पोलादी कामगार-एकजुटीच्या बळावर व 'धर्मराज्य'च्या बिरुदाखाली, या 'सहा आकडी' सन्म ानाला लवकरच पात्र ठरतील, अशी आशा करुया....**

**'सहा आकडी' पगार व 'सहा आकडी' बोनस...हा चमत्कार घडवणारा, महाराष्ट्रातीलच नव्हे; तर, संपूर्ण भारतातील एकमात्र 'कामगार-नेता' राजन राजे... तेव्हा, मराठी-श्रमिकवर्गाच्या हितासाठी ही 'धर्मराज्य' पताका, याहीपुढे अशीच दिमाखात फडकत राहो, ही लक्ष लक्ष मंगल-ज्योतींच्या साथीने ईशचरणी प्रार्थना... धन्यवाद!**

आपले नम्र,

*समीर चव्हाण, रत्नदीप कांबळे, निरंजन म्हात्रे*

**सुरुवात 'श्रीलंकेतून' झाली...एक 'बौद्ध धर्मीय' देश! नंतर जनविद्रोहाची आग भडकली, ती 'मुस्लिम देश' असलेल्या 'बांगला देशात' आणि आता चारही बाजुंनी पेटलाय तो 'नेपाळ'...कालपरवापर्यंतचं 'हिंदूराष्ट्र'!**

**...बरं गंमत अशी की, 'मुस्लिम राष्ट्रप्रमुख' शेख हसीना पळून आली, ती 'व्होट चोर, गद्दी छोड' जनआंदोलनाला सामोरे जाणाऱ्यांच्या व 'हिंदूराष्ट्र-संकल्पना' राबवण्याची केव्हाचीच स्वप्न पहाणाऱ्यांच्या...राक्षसी तावडीत सापडलेल्या भारतात आणि हिंदूराष्ट्रवाले नेपाळचे पंतप्रधान पळून गेलेत, ते दुबई या मुस्लिम देशात....अरेरे, 'आयटी-सेल'वाल्या अमित मालवीय आणि गृहमंत्री अमित शहा, यांच्या एका इशाऱ्यावर टीव्ही-सोशलमिडीयावर लाखो-करोडो 'पाट्या' टाकणाऱ्या निर्बुद्ध अंधभक्तांची केवढी पंचाईत झाली असेल नाही...???**

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



## ये लाल रंग !

साम्यवाद वंचितांच्या उन्नतीसाठी कृतिशील असतो. करुणा व शोकात्मिका यांना साहित्यात सर्वोच्च आदर मिळतो. सार्त्र यांनी नोबेल पुरस्कार नाकारला होता. याउलट 'उजव्या सोंडेचे गणपती' साहित्यात टीकास्पद ठरतात...निग्रो आणि दलित साहित्य जगात गाजतं. तात्पर्य, ''साम्यवाद हवेसारखा सर्वव्यापी व्हावा....'' *...सुनील कर्णिक*



*मुंबईतील गिरणी कामगारांसाठी लढा देणाऱ्या 'घर हक्क परिषद' या संघटनेची बैठक शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर-२०२५ रोजी, 'इंटक'चे जनरल सेक्रेटरी श्री. गोविंदराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परळ-भोईवाडा, मुंबई येथील कार्यालयात संपन्न झाली. यावेळी गिरणी कामगार व नागरिकांसाठीच्या जाहीरनाम्यावर सखोल चर्चा करण्यात आली. या परिषदेत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव व 'धर्मराज्य पक्षा'चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, पक्षाचे माहिती अधिकार ठाणे कक्षप्रमुख श्री. अनिल महाडिक, गिरणी कामगारांचे प्रतिनिधी व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. विश्वास उटगी, ज्येष्ठ विचारवंत श्री. शिशिर ढवळे, रेमण्ड कंपनीच्या कामगारांचे प्रतिनिधी श्री. विलास घाग, श्री. प्रदीप साळसकर आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. दरम्यान, 'घर हक्क परिषदे'ची आगामी बैठक रविवार, दि. १२ ऑक्टोबर-२०२५ रोजी, टिळक भवन, दादर-मुंबई दुपारी ३ वा. आयोजित करण्यात आल्याची माहिती, यावेळी आयोजकांकडून देण्यात आली.*

# भक्तांनो, आधी हे वाचा...

**मोत्याच्या विष्ठेवर भिरभिरणारे किडे, सोनम वांगचुगला देशद्रोही ठरवत, सोशल मीडियावर व्हायरल करत आहेत. खूप घाण शिव्या त्यांना द्याव्याश्या वाटतात; पण, मर्यादा आहेत काही लिहिण्याला... तरीही हे वाचा.**

..........................................

सोनम वागचुंगची खूप चर्चा सुरु आहे; पण, आधी त्यांच्या वडिलांविषयी, सोनम वांग्याल. थोडं जाणून घ्या

सन १९६५. फक्त २३ वर्षांचा एक तरुण पॅरामिलिटरी जवान. डोळ्यांत फक्त एकच स्वप्न, तिरंगा सर्वात उंच शिखरावर फडकवायचा! सोनम वांग्याल यांनी एव्हरेस्ट सर केले. त्याच वर्षी त्यांना अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्री सन्मान मिळाला.

**१९६५ मध्ये भारत आणि अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी, एक गुप्त मोहिम सुरु केली, नंदादेवी प्लूटोनियम मिशन. चीनच्या अणू-चाचण्यांवर लक्ष ठेवण्यासाठी, नंदादेवीच्या उंच शिखरावर गुप्त उपकरण बसवायचं होतं. सोनम वांग्याल या मोहिमेचा भाग बनले. डोंगरांचा मुलगा स्वतःचा जीव धोक्यात घालून राष्ट्राच्या सुरक्षेसाठी उभा राहिला.**

काळ पुढे गेला. १९८४ मध्ये जेव्हा लडाखमधील लोक अनुसूचित जमातीचा दर्जा मिळावा म्हणून रस्त्यावर उतरले, तेव्हा हाच सोनम वांग्याल त्यांच्या आंदोलनाचा नेता झाला. त्यांनी उपोषण सुरु केलं. तेव्हा देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. त्या स्वतः लेहला आल्या, संवाद साधला, संवेदनशीलतेनं बोलल्या आणि आंदोलनाला मार्ग दिला. एक उपाशी माणूस जिंकला... कारण, त्याच्यासमोर सत्ता नव्हती; तर, संवेदना उभी होती.



मग १९९३ आले. सोनम वांग्याल इंटेलिजन्स ब्युरोच्या असिस्टंट डायरेक्टर पदावरुन सेवानिवृत्त झाले. आयुष्यभर त्यांनी राष्ट्राच्या सुरक्षेसाठी, राष्ट्राच्या सन्मानासाठी, राष्ट्राच्या अस्मितेसाठी स्वतःला झोकून दिलं.

आणि आज? त्या देशाच्या सर्वोच्च सन्मानित वीराचा मुलगा सोनम वांगचुग जो शिक्षणासाठी, पर्यावरण सुधारणेसाठी लढला, जो स्वतःच्या लोकांसाठी उपोषणाला बसला, त्याला देशद्रोही ठरवलं जातं आहे.

**किती विचित्र विडंबना!**

**ज्या वडिलांनी चीनच्या अणुबॉम्बवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतःचा जीव हातावर धरला, त्याच्याच मुलावर आज 'चीन समर्थक' असल्याचा संशय घेतला जातोय. ज्याच्या वडिलांना पद्मश्री मिळालं, त्याच्या मुलाला देशद्रोहाचं शिक्कामोर्तब मिळतंय. ज्या वडिलांच्या उपोषणाला इंदिराजींनी स्वतःच्या संवेदनशीलतेनं तोड दिलं, त्याच मुलाच्या उपोषणाला नरेंद्र मोदी सरकार पोलिसी बंदोबस्त आणि टीव्ही प्रचारयंत्रणेतून तोडत आहे.**

ही फक्त सोनम वांगचुगची कहाणी नाही. ही त्या सत्तेची प्रतिमा आहे, जी संवादावर नाही; तर, दडपशाहीवर उभी आहे. जी प्रश्न विचारणाऱ्याला शत्रू मानते. जी देशभक्तीच्या वारशालाही देशद्रोहाच्या फाइलमध्ये ढकलून देते.

हा नवा भारत आहे, जिथं देशाच्या सर्वात उंच शिखरावर तिरंगा फडकवणाऱ्या वीराचा मुलगा, लोकशाहीच्या जमिनीवर उभाही राहू शकत नाही

हे सोनम वांग्याल यांचं २०१५ सालचं छायाचित्र आहे, जेव्हा १९६५च्या मोहिमेच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात, ते संपूर्ण टीमसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले होते.

*....दिलीप मिश्रा*

---

## संघ : सत्तेचा गुलाम, सत्याचा दुष्मन ...पृष्ठ क्र. ८ वरुन

ब्रह्मचर्य बोगस ठरला आहे...हीदेखील सत्तेची करामत आहे... ती शताब्दी वर्षात 'रा.स्व.संघा'चे अंतर्बाह्य रूप दाखवतेय!

**'राष्ट्राय स्वाहा, इदं राष्ट्राय इदं न मम' हा द्वितीय सरसंघचालक 'श्री गुरुजी गोळवलकर यांनी दिलेला मंत्र मोदी-शहा यांच्या सत्ता काळात पूर्णपणे गळपटलाय... हे संघ शताब्दी वर्षातले वर्तमान आहे आणि ते देशाप्रमाणेच हिंदू धर्मासाठीही घातक आहे!!**

१९४० च्या आसपास माझे पुन्हा संघाच्या शाखेवरचेच रुटिन सुरू झाले. कोणत्याही रुटिनमध्ये मी कधी रमलो नाही (शाळेच्या आणि नोकरीच्याही). तसे इथे झाले. मी दांड्या मारू लागलो. यातही समस्या होतीच. मी दांडी मारली की शाखेवरून अनंतराव दुचाकीवरून थेट माझ्या घराच्या खाली येऊन हाक मारत ...'ए बाळ!'

प्रथम प्रथम अपराध्यासारखा मी जाऊन खालमानेने हजर होई. कधी कसले तरी लटके कारण सांगत असे, कधी नुसताच ढिम्म उभा राही. अनंतरावांमध्ये फरक नाही. ते त्याच प्रेमळ सुरात, फूटपाथशी एका पायाच्या आधाराने टेकवलेल्या दुचाकीवर बसल्या बसल्या मला म्हणत, 'उद्यापासून नियमित ये.' तरी माझ्या दांड्या वरचेवर सुरू. अनंतरावांना 'फेस' करण्यातली माझी सुरुवातीची भीडही आता संपली, पण त्यांचा शांत, गंभीर, प्रेमळ (आता जरी कमी प्रेमळ) सूर संपला नाही. फक्त एकच बदल झाला. शाखेच्यावेळी एक रोज नवा स्वयंसेवक माझ्या घरी पोहोचू लागला. 'चल, शाखेवर.' झक मारत मी शाखेवर जाई. आजाराचे सोंग आणावे तर येणारा स्वयंसेवक म्हणे, मी येतो तुझ्याबरोबर डॉक्टरकडे, चल. म्हणजे तीही चोरीच. या सक्तीनंतर माझे मन हळूहळू शाखेवरून उडू लागले. नावीन्य संपले. रोज तेच तेच म्हणजे काय? यात एक निमित्त घडले.

एक दिवशी शाखेनंतर आम्हाला 'अन्तां'नी एका घरी आंबे खायला नेले. लहानपणी मी आंब्यावर पोसलेला. मी उत्साहात होतो. मग एका बशीत कापलेला हापूसचा आंबा घेऊन घरचे प्रमुख (हेही संघातले) आतून बाहेर आले आणि प्रथम माझ्यापुढेच त्यांनी हातातली बशी केली. मला घरची सवय. मी सगळी बशीच हातात पकडू लागलो तशी बशी माझ्यापासून लांब करीत ते मला म्हणाले, 'अंहं, बशी नव्हे, एकच काप घ्यायचे. आंबा सर्वांसाठी आहे, तुझ्या एकट्यासाठी नाही काही!'

सर्वांसमोर हा मला माझा घोर अपमान वाटला. सगळे माझ्याकडेच बघत मला हसताहेत असे मला वाटले.

**एका बशीतल्या फोडी सर्वांत विभागून शेवटी आंबा आणणारे माझ्यापुढे उभे राहून मला म्हणाले, 'स्वयंसेवकाने जे मिळेल ते सर्वांत विभागून घ्यायचे बरे. यात काय चुकीचे होते? संघात राहून त्यांनी समाजवादच सांगितला होता. ('हिंदू' समाजवाद!) पण माझे बिनसले ते बिनसलेच. हे त्यांनी सर्वांसमोर सांगितले हे झोंबले. त्यानंतर मी शाखेत जाणे सोडले. शाखेच्या वेळी घरी सापडायला नको म्हणून जवळच्या स.प. कॉलेजच्या मैदानावर जाऊ लागलो. आमच्या वर्गातली मुले तिथे क्रिकेट खेळत. मी त्यात सामील झालो. होता होता क्रिकेट खेळण्याचा नाद मला लागला.**

संघ मागे पडला याला आणखीही एक कारण घडले. मी डेक्कन जिमखान्यावर क्रिकेटच्या मॅचेस बघायला जाई. संघाची टोपी घातलेला आणि खाकी हाफपँटमधला एक तालीमबाज काळा तरुण या मॅचेस बघायला येई. खाकी चड्डी, टोपीशिवाय त्याचे चालणे, वावरणे यात तो संघातला असल्याच्या खुणा मला वाटत. एका मॅचला त्याने मला जवळ येऊन गाठले. मला खेटून तो बसला. मला त्याने नाव विचारले. माझ्या पाठीवरून जरा खालवर हात फिरवला. **मला तो स्पर्श वेगळा वाटला. त्यानंतर मला शोधून माझ्या शेजारीच तो येऊन खेटून बसू लागला. मी बाजूला सरके तेवढा तो मला जास्तच चिकटे. कधी माझ्या गळ्यात त्याचा केसाळ हात टाकी, कधी माझा नाजूक हात त्याच्या मोठ्या गुबगुबीत राकट हातात घेऊन गोंजारे, कधी गालगुच्चा घेई. मला हे आवडत नव्हते; पण याचा अर्थही कळत नव्हता आणि एक दिवस माझे लक्ष नसताना त्याने माझ्या कुल्ल्याला भला मोठा चिमटा काढला. मला दुखले त्याहीपेक्षा धक्का बसला. तो मात्र हसत होता. मी मॅच टाकून घराकडे धावत सुटलो. तो मागून येत नाही ना, हे वारंवार पाहात होतो. त्यानंतर तो कुठे मागेपुढे नाही ना, हे पाहातच चालत असे. त्याची मी धास्ती घेतली. त्याच्या डोक्यावरची संघाची टोपी आणि खाकी अर्धी तुमान हेही माझ्या संघ सोडण्याला एक कारण होते.**

***– विजय तेंडुलकर,***

(ते दिवस – राजहंस प्रकाशन, पुणे, २००९, पृष्ठे ७१ ते ७३)

# अमेरिका ते भारत : भूमिपुत्रांचा प्रश्न !

**एखाद्या भारतीय किंवा भारतात काम करणाऱ्या अमेरिकन कंपनीला किंवा एखाद्या अमेरिकन कंपनीला काही कर्मचारी हवे आहेत. ते त्यांची भरती करतात. त्यांचे एच-वन-बी व्हिसा चार्जेस मुख्य कंपनी भरते, त्यासाठी कंपनीकडून लागणारे पत्र अमेरिकन दूतावासाला दिले जाते आणि मग हा एच-वन-बी व्हिसा मिळालेला भारतीय तंत्रज्ञ अमेरिकेत जातो आणि आपली सेवा सुरु करतो.**

एक 'Hypothetic' आकडा सांगतो. समजा, त्याला अमेरिकेत १०,००० डॉलर्स पगार मिळणार आहे, भारताच्या तुलनेत हा ८.५० लाख रुपये महिना होतो. अर्थात, वर्षाचे १ कोटी रुपये; तर, तो अत्यंत खुश आहे... परंतु, हीच सेवा एखाद्या अमेरिकन तंत्रज्ञाने द्यायची असेल; तर, त्याचे मूल्य १५/२० कदाचित, २५,००० डॉलर्सपेक्षाही अधिक गेले असते. त्याला कारण आहे, अमेरिकेतील किमान वेतन कायदा. या कायद्यामुळे अमेरिकन नागरिकांना कोणत्या कामासाठी किती पगार दिला गेला पाहिजे, याचे सुस्पष्ट नियम आहेत आणि त्यानुसार या कंपन्यांना भारतीय तंत्रज्ञ अल्प किंवा अत्यल्प मूल्यावर काम करायला मिळत होते. भारतीय इंजिनियर मंडळींचा अमेरिकेत उल्लेख, उगीच 'टेक-कुली' असा होत नाही. भारतातील भारतीय कंपन्या, भारतातील अमेरिकन कंपन्या आणि अमेरिकेतील अमेरिकन कंपन्या या सगळ्यांनी या पद्धतीने आजवर समस्त भारतीय अभियंत्यांचे शोषण केले आहे. परंतु, रुपये डॉलरमधील फरकामुळे हे माहिती असले तरी, कोणताही अभियंता सुद्धा तक्रार करत नव्हता. सोप्या शब्दात सांगायचे असेल तर, एखादे आय. टी.मधील काम १०० तासांत होऊ शकते, असे अमेरिकन ग्राहकाचे मत असेल आणि त्याचे अमेरिकन पगाराच्या नियम ांनुसार मूल्य २५ डॉलर्स प्रती तास असे असेल तर, भारतीय कंपन्या हेच काम २० डॉलर्समध्येच करायला तयार होत असत आणि हे काम भारतात राहून होणार असेल तर, भारतीय अभियंत्यांना याचे ५ डॉलर्स मिळत असत आणि अमेरिकेत राहून काम केले तर, त्याचे १५ डॉलर्स मिळत असत. हे सगळे मी ढोबळ आकडे सांगतो आहे... याला शब्दशः घेऊ नका... थोडक्यात हा पगारातील फरकाचा भारतीय कंपन्यांना कट मिळायचा आणि अधिक नफा मिळायचा, त्यामुळे आपल्या आय.टी. कंपन्या प्रचंड पैसे छापत होत्या आणि स्टॉकमार्केटमध्ये सुद्धा धूम होती.

**दुसरीकडे अमेरिकेला स्वस्तात तंत्रज्ञ उपलब्ध होत होते, तिथल्या स्थानिक कंपन्यांचा फायदा होता. क्षेत्रफळ या दृष्टीने अमेरिका खूप मोठी आहे, त्यामानाने लोकसंख्या कमी. त्यामुळे, लक्षावधी भारतीय, अमेरिकेत नोकरी करायला जात होते, त्यापैकी बरीच मंडळी स्थायिक होत होती तरी, अमेरिकेला काही फरक पडत नव्हता. मुळातून समृद्ध देश, डॉलरच्या जागतिक महत्त्वामुळे तिजोरी भरलेली होती. अमेरिकेत सामान्य नागरिकांना सरकार प्रचंड सोई-सुविधा प्रदान करते, त्यामुळे आपल्या देशात हे 'टेक-कुली' येऊन नोकरी करत, पोट भरत पाय रोवत आहेत, याचे अमेरिकन नागरिकांना सोयरसूतक नव्हते.**

परंतु, आर्थिक सुबत्तेला दणके बसू लागले आणि मग सगळे खडबडून जागे झाले. तुमच्या नोकऱ्या भारतीयांना लुबाडू देणार नाही, हे ट्रम्प यांचे निवडणूक आश्वासन होते, आता ते त्याची पूर्तता करत आहेत.

आज ज्यांच्याकडे एच-वन-बी व्हिसा आहे, काही काळासाठी वैध आहे. त्यांना कशाची सुद्धा चिंता नाही. त्यांचा व्हिसा संपायची वेळ येईल, त्यावेळी त्यांच्या गुणवत्तेच्या बळावर त्यांची अमेरिकन कंपनी यांच्यासाठी एक लाख डॉलर खर्च करायचे की, नाही याचे मूल्यांकन करेल आणि माझा अंदाज चूक नसेल तर, ५०% मंडळींचे व्हिसा रिन्यू सुद्धा होतील. राहिलेल्या ५०% मंडळींना मात्र, परत येण्याची वेळ येऊ शकते.

**त्याचप्रमाणे भारतातून इन्फोसिस आणि अन्य आय.टी. कंपन्या विमाने भरभरुन तिथे स्टाफ पाठवत होत्या, त्याला ५०% आळा बसेल. जिथे आवश्यक असेल तिथे, कंपन्या १ लाख डॉलर भरुन सुद्धा माणसे पाठवतीलच. अर्थात, भारतातून जाणारी मंडळी ५०% कमी होईल, ५०% जातील.**

**भारतातील समस्त आय.टी. कंपन्यांचा नफा प्रचंड कमी होऊ शकतो. आय.टी. कंपन्यांचे शेअर्स कोसळू शकतात. याचा पहिला दणका उद्याच बसेल. ट्रम्पला शिव्या घालून, त्याला नालायक ठरवून आणि अमेरिकेची वाट लावेल ही भविष्यवाणी करुन झाली असेल तर, आता पुढील भाग वाचा... अर्थशास्त्राचा एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे... एकाच वस्तूचे, एकाच सेवेचे मूल्य जर भिन्न-भिन्न असेल तर, तिथे भ्रष्टाचार शंभर टक्के होतो.**

अमेरिकेतील आय.टी. सेवा, तिचे अमेरिकन नागरिकांना मिळणारे मूल्य आणि एच-वन-बी व्हिसाधारकांना मिळणारे मूल्य यात प्रचंड तफावत होती. तिथले राजकारणी, कंपन्यांचे मालक, भारतातील कंपन्यांचे मालक आणि भारतातील राजकारणी आपापल्या फायद्यासाठी या मुद्द्यावर सोईस्कर मौन बाळगून होते; कारण, प्रत्येकाला यात आपापला स्वार्थ साधता येत होता. सगळा सिद्ध साधकांचा खेळ होता. कंपन्या प्रचंड नफा कमावत होत्या. त्यातील हिस्सा अमेरिकन राजकारणी मंडळींना मिळत होता. भारतीय कंपन्या प्रचंड पैसा कमावत होत्या. शेअर मार्केटच्या माध्यमातून, सामान्य लोकांना लाभ होत होता... अर्थव्यवस्था मजबूत होत होती, त्यामुळे भारतीय राजकारणी सुद्धा खुश होते. जोडीला भारतात ही मंडळी राहिली असती तर, आरक्षणाचे प्रमाण वाढवण्याचा आणि त्यामाध्यमातून आपले राजकीय दुकान चालवण्याचा खेळ आजवर गुंडाळण्याची वेळ आली असती, ते टळत होते. बुद्धिमान मंडळी देश सोडून जात होती आणि कमी बुद्धिमान मंडळी प्रशासनात भरून राजकारणी मंडळींना देश लुटता येत होता..

**थोडक्यात, सगळ्यांचे भले होत होते आणि 'टेक-कुली' मंडळी सुद्धा भारतातील आरक्षणाच्या स्पर्धेत नोकरी मिळणे कठीण, इतका पगार मिळणे कठीण, म्हणून हे सगळे समजत असूनही 'द ग्रेट अमेरिकन ड्रीम'च्या आहारी जाऊन आपली बुद्धिमत्ता दुसऱ्या देशाचे भले करण्यासाठी आणि या सगळ्या नेटवर्कला पोसण्यासाठी खर्च करत होते.**

डोनाल्ड ट्रम्प या अपारंपारिक राजकारण्याने सगळ्यांचीच गोची करुन ठेवली आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारताबाहेर जाणारी मंडळी ५०% कमी होणार. भारताबाहेर गेलेल्या मंडळींपैकी, व्हिसा कालावधी संपलेल्या मंडळींपैकी ५०% मंडळी परत येणार... इतक्या बुद्धिमान लोकांना योग्य नोकरी, व्यवसाय प्रदान करणे आणि अमेरिकेच्या इतके नाही; पण, त्याच्या ५०% तरी उत्पन्न कमावता येईल अशी संधी उपलब्ध करुन देणे हे, भारत सरकार समोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

**नरेंद्र मोदींनी आज दिलेला स्वदेशीचा नारा, त्या दृष्टीने आणि त्या अर्थाने समजून घेणे आवश्यक आहे. या बुद्धिमान लोकांचा, देशातील जॉब यंत्रणेवर आणि स्वयंरोजगार यंत्रणेवर निर्माण होणारा दाब लक्षात घेता, आरक्षण धोरण कायमचे रद्द करा हे सरकारवर दडपण निर्माण करण्याची ही सर्वात उत्तम वेळ आहे, हे समस्त राष्ट्रभक्त नागरिकांनी समजून घेणे आवश्यक आहे.**

**या घटनाक्रमामुळे अजून काय-काय घडेल...???**

स्टॉकमार्केटची सूज उतरेल. मुख्यत्वे आय.टी. कंपन्यांचे स्टॉक कोसळतील आणि काही काळाने स्थिर होतील. बांधकाम उद्योगाला दणका बसेल. शहरातील गृहप्रकल्पांना दणका बसेल. बांधकामक्षेत्राची सूज उतरेल. या सगळ्या समस्येकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टीकोन देतो, तो पण लक्षात घ्या... मुंबईत गिरण्यांची संख्या वाढल्यावर, कोंकण भागातून चाकरमानी आले. त्यांचे पगार आणि तत्कालीन स्थानिक मुंबईकरांचे पगार यात तफावत होती. पुढे गिरण्या बंद पडल्या आणि बांधकाम उद्योग फोफावला, त्यावेळी चाकरमानी आणि स्थानिक मुंबईकर मागे पडले आणि स्वस्तात काम करणारे यूपी-बिहारी आपल्याकडे आले. **हॉटेल व्यवसायात अण्णा लोक घुसले. पुढे जाऊन बांधकाम व्यवसायाला आय.टी.ची सूज चढल्यावर, यूपी-बिहारी येणे सुद्धा पुरेना, त्यावेळी आपल्याकडे बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसवले गेले. आपल्याकडील कष्टाची कामे, जातीनिहाय कामे, आपल्या लोकांनी करणे बंद केले. ते सगळे व्यवसाय मुसलमान लोकांनी काबिज केले आहेत. आता फळवाला, भाजीवाला, मासळी विकणारा, पंक्चर काढणारा, कटींग करणारा, खाटीक सगळे मुसलमान आहेत. या क्षेत्रातल्या समस्त हिंदू मंडळींची उपस्थिती नगण्य झाली आहे.**

जे अमेरिकेत घडले आहे, तेच भारतात सुद्धा घडले आहे, घडते आहे. भविष्यात कधी ना कधी आपल्या देशात सुद्धा एकेका मुख्यमंत्र्याला, पंतप्रधानाला असेच निर्णय घ्यावे लागतील. बांगलादेशी, रोहिंग्या हाकलून द्यावे लागतील आणि स्थानिकांना रोजगार द्यावा लागेल... स्थानिकांना हे रोजगार स्विकारण्याची लालूच द्यावी लागेल. त्यांना श्रमसंस्कृती आत्मसात करण्यासाठी प्रेरित करावे लागेल. स्थलांतरित, शरणार्थी आणि घुसखोर या तीन समस्या आहेत. या समस्यांचा सामना प्रत्येक देशाला करावा लागतो आहे. प्रत्येक राज्याला करावा लागतो आहे. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने या समस्येशी लढतो आहे. परंतु, हा प्रश्न बहूअंगी आहे. यावर एकांगी विचार करणे चुकीचे ठरेल !!!

*...सुजीत भोगले.*

***भले, यापूर्वीच मी कामगारांसाठी प्रचंड लिखाण, शेकडो भाषणे व असंख्य संघर्ष-आंदोलने केली असली; तरीही खास वरील संदर्भात कामगार-प्रबोधन, कामगार-जागृती (कामगारघातकी धोरणांविरुद्ध प्रभावी उपाययोजनांसह) म्हणून, एक चारसहा लेखांची मालिकाच, क्रमशः व्हॉट्सपवरुन आजपासून शक्यतोवर दर दिवशी पाठवायचं म्हणतोय...कामगारांनी प्रतिसाद दिल्यास ती मालिका चालू राहील व वाचून ती लेखमालिका कामगारांना उपयुक्त वाटलीच; तर, तिची छोटेखानी पुस्तिका आपण प्रकाशित करण्याचा विचार करु शकतो, एवढं कृपया ध्यानात घ्या!***

लेखक : **राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

## लेख क्रमांक २

**कंत्राटी-कामगार पद्धत, हा कामगार-चळवळीला लागलेला मूळ रोग अथवा संपूर्ण चळवळ ग्रासणारा कर्करोग (कॅन्सर) का म्हणायचा?**

उत्तर : 'कंत्राटी-कामगार पद्धत' आणि तिनं प्रसवलेली काळीकुट्टं पिल्लं म्हणजे, आऊटसोर्सिंग (Out Sourcing), NEEM² OR FTE, Sub-Contracting यांच्यासोबतच अगदी वेगळ्या अर्थानं का होईना; पण, हल्लीची लष्कर-भरतीतली 'अग्निवीर-व्यवस्था' (नाव फारच गोंडस ठेवलंय, जेव्हा ते लष्करीसेवेत प्रवेश करु पहाणारे नवतरुण, प्रत्यक्षात 'अग्निवीर' वगैरे नसून नव्या प्रकारच्या भरतीद्वारे 'भग्नवीर' बनवले गेले आहेत)...या साऱ्याच बाबी म्हणजे, आधुनिक भांडवली-व्यवस्थेतली 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता'च (Socio-Economic Participatory Exclusion) होय, दुसरंतिसरं काहीही नाही!

'कंत्राटी-कामगार पद्धत' मूळ रोग वा कर्करोग म्हणण्याची कारणे ही की, कंत्राटी-कामगार पद्धतीमुळेच केवळ....

१) डावे वगळता सगळेच प्रस्थापित राजकीय पक्ष, हे निवडणुकीत मोठ्या देणग्या मिळवण्यासाठी भांडवलदारांचे सहानुभूतीदार व पडद्याआड कामगारांचे 'हितशत्रू' होतेच... पण, या राजकीय पक्षांच्या गुंड प्रवृत्तीच्या मनगटशहांना 'कंत्राटदार' बनून, आपल्याच जातीजमातीचं 'रक्तघाम' जास्तीतजास्त स्वस्तात विकण्याची व त्यातून बक्कळ पैसा कमावण्याची 'छप्पर फाड के' अशी नवी संधि उपलब्ध झाली. ही 'कंत्राटी-कामगार' पुरवण्याची बिनभांडवली-बिनकष्टाची आयती 'सोन्याची खाण' हाती लागल्याने...बहुतेक सगळ्याच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कामगारांचे अजूनच जास्त 'हितशत्रू' बनले (तशी ही बव्हंशी सगळीच मंडळी; यापूर्वीच, संपफोडेगिरीतून पैसा कमावणारे किंवा व्यवस्थापकीय मंडळींशी विविध कारणांसाठी सलगी-साटंलोटं करणारी अथवा कंपन्या-कारखान्यांमधून थेट हप्ते गोळा करण्याच्या निमित्ताने, अगोदरपासून कामगारांचे 'हितशत्रू' होतीच)... त्यामुळेच, या 'राजकीय-मसलपॉवर'च्या साथीनेच व्यवस्थापकीय मंडळी जागोजागी एकदम शिरजोर बनली

२) 'कायम व कंत्राटी', असे 'फोडा आणि झोडा' या ब्रिटीश-कुटीलनीतिने कामगारविश्वात भांडवली-व्यवस्थेकडून सवतेसुभे उभे केले गेल्याने व त्याला सगळेच कामगार बळी पडत गेल्याने...कामगारांमध्येच एकमेकांविषयी आकस, संशय व एकप्रकारे शत्रुत्वच निर्माण झाले. त्यामुळे, एकसंध व मजबूत कामगार-संघटना बांधणं व बांधलेली संघटना चालवणं जवळपास अशक्य बनलं

३) व्यवस्थापनांकडून सर्रास 'अनुचित कामगार प्रथां'चा उघडउघड अवलंब केला जात राहून...व्यवस्थापकीय दहशत व दादागिरी (Corporate-Terrorism), 'राजकीय-वरदहस्ता'ने कधी नव्हे, एवढी भयानक वाढली व 'कायम आणि कंत्राटी' (कंत्राटी-कामगारांची अवस्था अजूनच वाईट) असे दोन्हीप्रकारचे कामगार भयभीत होऊन भांडवली-सापळ्यातील 'गुलाम' बनले

४) एवढं सगळं 'कंत्राटी-रामायण' घडायला लागल्यानंतर...कामगारांचे पगार / बोनस रोडावत जात तुटपुंजे होणे, हक्काच्या रजा व मेडिक्लेम वगैरे सोयीसुविधा घटत जाणे; तसेच, कामाचे तास बेकायदा वाढणे (सक्तिचा ओव्हरटाईम, त्यात आलाच) वगैरे ओघानेच येत गेलं

५) आपल्याकडचं 'किमान-वेतन', म्हणूनच पाश्चात्य देशातल्या धड 'बेकार-भत्त्या'च्याही लायकीचं राहीलं नाही... जेव्हा, ते आजच्या फडतूस 'किमान-वेतना'च्या चौपटीने म्हणजे रु.४०,०००/- (रु. चाळीस हजार) दरमहा असायला हवं होतं... 'Purchasing Power Parity'चा (PPP) विचार करता चीनचं किमान-वेतन देखील आपल्या दुपटीहून पटीहून जास्त आहे आणि तिथला कुशल कामगार दरमहा 'सहा आकडी' म्हणजेच, लाखाहून अधिक पगार घेतो. याचाच अर्थ, चिनी-कामगार आता पूर्वीसारखा बिलकूल 'स्वस्त' राहिलेला नाही... तर, प्रगत देशांमध्ये जास्तीतजास्त वेतन (उदा. MD किंवा CEO वगैरेंचं), हे कंपनीतल्या तळाच्या कामगाराच्या वेतनाच्या तुलनेत जास्तीतजास्त १२ ते २० पट ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न असतो (आपल्याकडे तेच प्रमाण हजारो पटीत असतं) व तसा प्रघात आहे. म्हणूनच, तिथल्या कामगाराचं वेतन हे, PPP विचारात घेता, आपल्या कामगाराच्या सातआठ पटीहून अधिक असतं.

विशेष बाब म्हणजे, पाश्चात्य प्रगत देशात एका आठवड्याचे कामाचे तास ३२ ते जास्तीतजास्त ४० असतात...म्हणजेच, '५ दिवसांचा कामाचा आठवडा व दररोजचे कामाचे तास ८ किंवा ८ तासांहूनही कमी. अजून महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, तिथे कामगारांच्या 'ओव्हरटाईम'वर कडक कायदेशीर बंधनं आहेत व कुणाचाही मुलाहिजा न ठेवता, तेथील सरकार त्याची अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी करतं.

६) पूर्वीसारखा किंवा जगभरात आजही मिळतो तसा, थेट पगार किंवा थेट पगारवाढ न देता...कामगारांची घोर फसवणूक करणारी 'कॉस्ट टू द कंपनी' (C.T.C.) ही एक तद्दन फसवी संकल्पना, 'कंत्राटी-गुलामी'सोबतच रुढ केली गेली आणि जोडीला सन्मानजनक 'Entry Levels'व बदलता-महागाईभत्त्यासह (VD), जगभरात व कालपर्यंत भारतातही प्रचलित असलेल्या वेतनश्रेणींच्या शास्त्रीय-संरचनाच उध्वस्त करुन प्रत्येक कामगाराशी वेगवेगळा स्वतंत्र करार करण्याची बदमाषीपूर्ण व्यवस्थापकीय-टूमच निघाली... म्हणजेच, कामगारांच्या लुटालूटीला व लाचारीला आपसूकच सर्वत्र एकच उधाण येऊ लागलं व 'युनियन्स' कॉर्पोरेटीय क्षेत्रातून कायमच्या बाद होण्याची प्रक्रिया वेगात सुरु झाली

७) अशाप्रकारे, याअगोदरच मरणासन्न झालेली 'कामगार-चळवळ' कायमची संपुष्टात आणण्यासाठी 'काळी कामगार-संहिता' (Black Labour Code) लादण्याची हिंमत... कंत्राटी-कामगारपद्धतीमुळेच भाजप-संघीय NDA सरकारला झाल्याचेही, वाचकांच्या सहजी ध्यानात येईल

...थोडक्यात सांगायचं तर, घोडा का अडला, भाकरी का करपली, पान का सडलं या तिन्ही प्रश्नांचं उत्तर जसं एकच म्हणजे, न फिरवल्यामुळे असं एकच आहे...तशीच अवस्था, एका 'कंत्राटी-कामगार पद्धती'मुळे सगळ्याच कामगारघातकी-धोरणांच्या विषवल्लीची पैदास सुरु होण्यातून झाली!

## लेख क्रमांक ३

...एव्हाना वाचक-कामगारांच्या ध्यानात आलं असेलच (खरंतर, यायलाच हवं) की, कामगारविश्वात शिरलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धत' नावाच्या एका भयंकर अवदसेमुळेच केवळ कामगारविश्व, प्रथम झाकोळून गेलं आणि मग चारही बाजुंनी घरघर लागल्यासारखं कोसळू लागलं. घर फिरल्यावर घराचे वासे फिरतात असं जे आपण म्हणतो, त्याचा जिवंत प्रत्ययच, चारही बाजुंनी कामगारविश्वावर होऊ लागलेल्या आक्रमणातून आपल्याला यायला लागलाय.

...तेव्हा, मूळ रोगावरच इलाज करायचा की, फक्त दृश्य स्वरुपातल्या रोगाच्या लक्षणांवर करायचा, हे ठरविण्याची वेळ आता आलीय. कामगार, भांडवली-व्यवस्थेकडून उघड उघड चार फटके पडायला लागल्यावर (काळी कामगार-संहिता किंवा लेबर-कोड, बेकायदेशीर कामाचे वाढीव तास अधिकृत जाहिर करणे वगैरे) आता कुठे आपल्या ग्लानीतून-झोपेतून जागा होतोय...त्याचा 'कामगारधर्म' किंवा कार्ल मार्क्स म्हणतो तशी, त्याची 'वर्ग-जाणीव' जागती आहे; तोवरच, या मूळ रोगाचा एकदाचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे व त्यासाठी, निश्चय-निर्धारपूर्वक ठाम पावलं टाकली पाहिजेत.

लक्षात ठेवा, 'भांडवलदारवर्गा'ची वर्ग-जाणीव ही, ते कायमच 'जागली' राखतात; म्हणूनच आपण त्यांच्यापेक्षा संख्येनं कैकपटीने अधिक असूनही व मतदानापुरती का होईना; या देशात 'लोकशाही- व्यवस्था' असूनही, भांडवलदार आपल्यावर वेडंवाकडं राज्य करतात आणि वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारच्या अन्याय-अत्याचार-शोषणाला आपल्याला सतत तोंड द्यावं लागतं. आपलं अवघं जगणं म्हणजे, निव्वळ भांडवली-व्यवस्थेची गुलामी...सतत उद्याची चिंता व चिंतेतून जमेल तसा सततचा संघर्ष, अशा अवस्थेप्रत भांडवली-व्यवस्थेनं आणून ठेवलंय आणि ही भांडवलदार मंडळी मात्र, तूफान चंगळवादानं भरलेलं व बेफाम ऐय्याशीचं आयुष्य आपल्या अवतीभवती भोगताना दिसतात.

...तेव्हा, मूळ रोगावरच इलाज करायचा, आपण ठरवलं असेल; तर, जागी झालेली सगळी 'कामगार-शक्ति' फक्त, या कामगारमंत्र्यांच्या दिवसाचे बारा तास काम करण्याच्या बेकायदेशीर फर्मानाविरुद्धच पणाला लाऊ नका!

हे भाजप-संघीय लोक व त्यांनी पाळलेले शिंदे-पवार गटाचे तट्टू, कितीही आपले पार्श्वभाग जमिनीवर आपटत बसले; तरी त्यांना 'कायदा' करुनही दिवसाचे कामाचे तास, तसे वाढवणे शक्य नाही...कारण, तो कायदाच 'बेकायदा' ठरेल. भारत, हा ILO (International Labour Organisation) या 'आंतरराष्ट्रीय कामगार संघटने'चा संस्थापकीय-सदस्य असून, त्याने पारतंत्र्याच्या काळातच वर्ष-१९१९मध्ये या संघटनेच्या आठवड्याचे जास्तीतजास्त ४८ कामाचे तास व दिवसाचे जास्तीतजास्त ८ कामाचे तास अशा करार/ठराव क्र. १ वर सही केलेली आहे, म्हणूनच!

इथे विशेषत्वाने कामगार-कर्मचारीवर्गाने, हे ध्यानात घेणं गरजेचं आहे की, २३ मे-१९५७ ला जगभरात लागू झालेला, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा ...पृष्ठ क्र. १३ वर

# कामगारांच्या वाढत्या आत्महत्यांचं संकट....

भारत सरकारच्या राष्ट्रीय गुन्हेगारी रेकॉर्ड ब्यूरोने नुकताच, 'भारतातील अपघाती निधन आणि आत्महत्या-२०२३' हा अहवाल प्रसिद्ध केला असून, त्यातील आत्महत्येविषयक निष्कर्ष अत्यंत चिंताजनक आहेत. व्यवसायानुसार केलेल्या वर्गवारीनुसार, रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांमध्येच आत्महत्यांचे प्रमाण देशात सर्वाधिक आहे. २०२३ या एका वर्षात देशात झालेल्या एकूण १,७१,४१८ आत्महत्यांपैकी तब्बल ४७,१७० (२७.५%) आत्महत्या रोजंदार कामगारांच्या आहेत. 'विकसित भारता'साठीचे या कामगारांचे योगदान अनन्यसाधारण असूनही आज देशातील जवळपास प्रत्येक चौथी आत्महत्या ही, रोजंदार कामगाराची आहे. अधिकृत आकडेवारीनुसार २०१४च्या तुलनेत २०२३मधील रोजंदार कामगारांच्या आत्महत्येत तीनपट वाढ झाली आहे. २०१४पासून आजवर सुमारे ३.५ लाख रोजंदार कामगारांच्या आत्महत्यांची नोंद झाली आहे. गेल्या दशकात कामगारांच्या आत्महत्येत सातत्याने वाढ होत असून, औपचारिकरीत्या नोंद न झालेल्या कामगारांच्या आत्महत्येचा आकडा अधिक असेल. कामगारांच्या या आत्महत्या हे केवळ वैयक्तिक हतबलतेचे परिणाम नसून, व्यवस्थात्मक अपयश आणि संरचनात्मक हिंसाचाराचे स्पष्ट प्रतीक आहेत. या वास्तवाकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता, सामाजिक न्यायाच्या चौकटीतून आणि संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. कामगारांच्या शोषणाचा केंद्रबिंदू, भारतामध्ये असंघटित क्षेत्र हा रोजगाराचा सर्वात मोठा आधार असून, जवळपास ८८ टक्के कामगार या क्षेत्रात कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांसाठी असंघटित क्षेत्रातील रोजगार हेच उपजीविकेचे मुख्य साधन आहे. पण, असंघटित क्षेत्रातील रोजगार हाच मुळात अस्थिर, अल्पपगारी आणि असुरक्षिततेने ग्रासलेला आहे. परिणामी, कामगार सतत कर्जाच्या विळख्यात अडकलेले असतात. जगण्यासाठी या शोषणकारी व्यवस्थेचा भाग बनून राहण्यापलीकडे, रोजंदार कामगारांकडे कोणताच पर्याय उरत नाही. कोरोनात्तर काळात, भारतात असंघटित श्रम बाजारपेठेत रोजगारसंबंधी जोखीम, अनिश्चितता आणि विषमता वेगाने वाढलेली आहे. रोजंदार कामगारांच्या असुरक्षिततेचे महत्त्वाचे कारण म्हणजे, संघटन आणि सामूहिक-शक्तीचा अभाव होय. कामगार संघटितच नसल्याने, वेतन आणि कायदेशीर हक्कांची मागणी करण्यासाठी कामगारांना बळ मिळत नाही. सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने या कामगारांची परिस्थिती आणखीच गंभीर आहे; कारण, आरोग्य विमा-अपघात भरपाई, निवृत्तीवेतन यांसारख्या मूलभूत हमी त्यांना फारशी मिळत नाहीत. आज 'ई-श्रम'सारख्या योजनांमधून, मोठ्याप्रमाणात असंघटित कामगारांची नोंदणी केली जात आहे. परंतु 'ई-श्रम' नोंदणी झाल्यानंतरही, प्रत्यक्ष लाभ फारसे मिळत नाहीत. शेवटी काम गार 'ई-श्रम' कार्ड, बांधकाम कार्ड, जनआरोग्य कार्ड, आधार, पॅन, दारिद्र्यरेषेखालील कार्ड, अंत्योदय कार्ड अशा अनेक ओळखपत्रांसह परिवर्तनाच्या प्रतीक्षेत आशेने उभा असतो. या कार्डांमुळे मिळालेली 'ओळख' आणि नोंदणीच्या माध्यमातून कामगार विविध योजनांचे 'लाभार्थी' म्हणून मोजले जातात. मात्र, त्याच्या सन्मानजनक रोजगारनिर्मिती, सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक समावेशनाबाबत राज्यसंस्था उदासीनच राहते. या संपूर्ण प्रक्रियेत कामगारांचे 'कार्डधारक'होणे हेच जणू विकासाचे निर्देशांक बनले आहे. कार्डांचा वाढता आकडा सरकारच्या अहवालांत आणि जाहिरातींमध्ये यशाचे मोजमाप ठरतो; पण, प्रत्यक्षात कामगाराच्या जीवनस्थितीत कोणताही मूलभूत बदल होत नाही, हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. ज्या कामगारांकडे कोणतेही कार्ड किंवा कागदपत्र नाही, ते 'नोंदणीकृत' न ठरता राज्यसंस्थेच्या नजरेतून पूर्णपणे अदृश्य राहतात. कामगारांचा हा वर्ग अतिवंचित आणि असुरक्षित ठरतो. गोपाळ गुरु या वर्गाचे वर्णन 'अस्मिता लुप्त झालेला आणि बिनचेहऱ्याचा वर्ग' असे करत, त्याचा संदर्भ जागतिकीकरणाच्या संरचनेशी



जोडतात, जिथे आर्थिक आणि सामाजिक प्रक्रियांतून व्यक्तीची श्रमशक्ती आणि ओळख दोन्ही हरवतात. याच असंघटित कामगारांना गाय स्टँडिंग 'प्रिकॅरिएट वर्ग' असे संबोधतात. यामध्ये अकुशल-अर्धकुशल कामगार त्यातही महिला कामगारांची स्थिती तर अधिकच बिकट आहे.

## आत्महत्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण :

आत्महत्येच्या घटना बहुतेकदा वैयक्तिक नैराश्याशी जोडल्या जातात. परंतु जेव्हा समाजामध्ये आत्महत्येचा एक विशिष्ट आकृतिबंध दिसतो, तेव्हा अशा घटना 'सामाजिक तथ्य' असून, त्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण होणे गरजेचे आहे, असे समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम मांडतो. दुर्खीमच्या मते, आत्महत्येचा दर हा, त्या व्यक्तीचे समाजात होणारे समावेशन आणि समाजातील अस्तित्वात असणारी नियमने, प्रमाणके यांच्या पातळीवर अवलंबून असतो. भारतातील रोजंदार कामगारांच्या आत्महत्यांचे विश्लेषण करताना दुर्खीमच्या 'आत्मकेंद्री आणि प्रमाणकशून्य किंवा नियमहीनता' हे आत्महत्येचे दोन प्रकार महत्त्वाचे ठरतात. मागील अडीच दशकांत भारताच्या सामाजिक मूल्यव्यवस्थेत मोठी स्थित्यंतरे घडली आहेत. कुटुंब, विवाह, नातेसंबंध, ग्रामीण ऐक्यभाव आणि समरसतेची मूल्ये ढासळत असताना, स्वकेंद्री, शहरीकरणास अनुकूल अशी नवी सामाजिक मूल्ये प्रस्थापित होत आहेत. खेड्यांतही 'शहरी संस्कृती' स्थिरावत आहे. वाढत्या चंगळवादी आणि ग्राहकवादी मूल्यांमुळे व्यक्ती प्रत्यक्ष समाजापासून दुरावतो आणि सामाजिक विघटनाची प्रक्रिया गतिमान होते. अशा विघटनांतूनच आत्महत्या घडतात असे दुर्खीम सांगतो.

प्रामुख्याने मागील दशकांत शहरे 'विकासाची इंजिन' बनल्यामुळे, आणि समांतर ग्रामीण रोजगार संपुष्टात आल्याने रोजंदार कामगाराला शहराकडे स्थलांतर होण्याशिवाय पर्याय उरला नाही. शिवाय शहरी स्थलांतरामुळे जीवनमान उंचावेल, परिस्थिती बदलेल अशी अपेक्षाही कामगार करतात. परंतु, स्थलांतर करुनही कामगारांच्या जीवनात फारसा फरक पडत नाही. उलट शहरी असंघटित व्यवस्था नव्या स्वरूपात कामगारांचे शोषण सुरुच ठेवते. गाव, कुटुंब, समुदायापासून दुरावलेला आणि स्थलांतरानंतर शहरात प्रचंड एकाकीपणा आणि अपयश अनुभवणारा कामगार, समाजाशी नाळ तुटल्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त होतो. कार्ल मार्क्सने या स्थितीला 'अलगता' असे म्हटले आहे. जेव्हा कामगार आपल्या श्रमांपासून, सहकाऱ्यांपासून आणि स्वतःच्या मानवी अस्तित्वापासून तुटतो, तेव्हा अखेर तो जीवनाशीही नातं तोडतो. सामाजिक रचना, संतुलन आणि प्रमाणके अचानक कोसळल्यावर उद्भवणाऱ्या आत्महत्येला दुर्खीम 'प्रमाणकशून्य आत्महत्या'असे संबोधतो.

## कामगार आहेत अदृश्यच :

समाजशास्त्रज्ञ सॅस्किया सॅसन यांच्या मते, नव-उदारमतवादी जागतिक शहरे केवळ तंत्रज्ञान, वित्तीय भांडवल आणि गगनचुंबी इमारतींच्या प्रतीकात्मक वैभवावर उभी नाहीत; तर, ती स्थलांतरित, महिला आणि असंघटित कामगारांच्या सततच्या श्रमावर टिकून आहेत. मात्र, या शहरी विकासाच्या झगमगाटाखाली हेच कामगार अदृश्य राहतात. कामगार आणि कामगारांच्या कुटुंबांचे प्रश्न हे केवळ आर्थिक नव्हे; तर, सामाजिक आणि नैतिकही आहेत. त्यांची समग्रतेने चर्चा होणे, त्यावर आधारित धोरणं आखली जाणे आणि कार्यनीती ठरवली जाणे अत्यावश्यक आहे. मात्र, दुर्दैवाने कामगारांचे प्रश्न प्रशासकीय पटलावर फारसे दिसत नाहीत. केंद्र सरकारने चार वर्षांपूर्वीच स्थलांतरित कामगार धोरणाचा आराखडा जाहीर केला होता; परंतु, आजतागायत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. कामगारांच्या वाढत्या आत्महत्येस संकट मानत, सामाजिक न्यायाच्या चौकटीतून त्याचे आकलन आणि उत्तर दोन्ही शोधत ठोस कृती करणे गरजेचे आहे!

*डॉ. कुलदीपसिंह राजपूत*

(लेखक कामगार-स्थलांतर विषयाचे अभ्यासक आणि रुबल फाउंडेशनचे संचालक आहेत.)

---

### कामगार-प्रबोधन, कामगार-जागृती

...पृष्ठ क्र. १२ वरुन

करार/ठराव क्र. ४७ हा, 'पगारात कुठलीही कपात न करता', दिवसाचे कामाचे तास ४८ वरुन कमी करत ४० तासांवर आणून ठेवतो; म्हणजेच, 'पाच दिवसांचा आठवडा' घोषित करतो... मात्र, संतापजनक बाब ही की, त्यावर भारताने अजूनही सही केलेली नाही!

म्हणूनच, कंपन्या-कारखान्यांमधील 'कामगार-शक्ति' ही, युनियन्स एकदम मजबूत बांधण्याकडे ('तू मोठा की, मी मोठा' वगैरे आपापसातले फालतू मतभेद गाडून टाकून व काम गारांमधल्या नीच-गद्दार प्रवृत्तींना टाळून) , सततच्या सक्तिच्या 'ओव्हरटाईम'चा 'पांगुळगाडा' आपल्या तुटपुंज्या पगाराला देण्याचं ठामपणे नाकारण्याकडे, सन्मानजनक वेतन-बोनस मिळवण्याकडे व मुख्य म्हणजे, कंत्राटी-कामगार पद्धतीचं पूर्णतः निर्मूलन करण्याकडे खर्ची पडली पाहिजे!

...शक्य आहे की, या कंत्राटी-कामगार पद्धतीचा फार मोठा विळखा आपल्या कंपनीत पडलेला असेल, आपल्याच दुर्लक्षामुळे ठिणगीचा वणवा होऊन तो खूप पेटला असेल; तर, कंपनी-दहशतवातून (Corporate-Terrorism) निर्माण झालेल्या 'कंत्राटी-चक्रव्यूहा'तून नेमका काय आणि कसा मार्ग काढता येईल, ते सविस्तर पुढील लेखातून बघूया...आपणही त्यासंदर्भात सूचना करु शकता, धन्यवाद!

# महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने घटनेची पायमल्ली करणे टाळावे !

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका आटोपल्या आणि निकालाही लागले. त्यानंतर नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेतली. त्यांचे मंत्रिमंडळही गठित झाले. खातेवाटपही पूर्ण झाले. पालकमंत्रीही ठरले. त्यानंतर महामंडळे आणि समित्यांवर नेमणुकांचे गुऱ्हाळ सुरू झाले. याच दरम्यान कधीतरी विधान परिषदेच्या राज्यपाल नामनिर्देशित १२ सदस्यांपैकी ५ सदस्यांच्या निवडणुकांचा प्रश्न राजकीय वर्तुळात ऐरणीवर आला.

आपल्या देशात सांसदीय लोकशाही पद्धती स्वीकृत झाली. त्यावेळी घटनेत ब्रिटनच्या धर्तीवर दोन सभागृहे निश्चित करण्यात आली. त्यातील एक देशभरातील सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे सभागृह म्हणजेच लोकसभा हे असेल, तर एक मान्यवरांचे सभागृह हे राज्यसभा म्हणून ओळखले जाईल, असे निश्चित केले गेले. राज्यसभेत राज्यातील विधानसभांतून निवडून दिलेले सदस्य हे खासदार म्हणून राहतील, आणि त्याचबरोबर राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेले सदस्यही खासदार म्हणून राहतील असे निश्चित करण्यात आले होते. राष्ट्रपतींनी हे सदस्य कसे नामनिर्देशित करावे याबाबत घटनेत स्पष्ट निर्देश दिले असून घटनेच्या १७१/ ३इ आणि १७१/५ या कलमांम'ध्ये ते स्पष्ट करण्यात आले आहे.

ज्याप्रमाणे राज्यसभेत राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे त्याचप्रमाणे राज्यांमध्ये जिथे विधान परिषदा आहेत तिथे विधान परिषदेतही राज्यपाल नामनिर्देशित सदस्य नेमणूक करण्याची तरतूद घटनेत आहे.

राष्ट्रपती किंवा राज्यपालांनी असे नामनिर्देशित सदस्य नेमण्याची घटनेत तरतूद करण्यात आली.

त्यामागेही काही निश्चित कारणे आहेत. समाजातील ज्या मान्यवर व्यक्तींचे राज्यकारभार सुचारू रूपाने चालवण्यासाठी मार्गदर्शन अपेक्षित आहे मात्र ज्या व्यक्ती राजकारणात येऊ इच्छित नाहीत आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरून निवडणूक लढवण्यास इच्छुक नाहीत किंवा निवडणूक लढली तरी निवडून येणार नाहीत अशा विविध विषयातील किंवा क्षेत्रातील तज्ज्ञ, जाणकार, अनुभवी, अभ्यासू व्यक्तींना इथे नेमावे असे घटनाकारांना अभिप्रेत होते. घटनेच्या १७१/५ या कलमांत या व्यक्ती कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा आणि सहकार या क्षेत्रातील असाव्यात असे नमूद करण्यात आले होते. या नेमणूका ६ वर्षांसाठी असतात आणि या सदस्यांना इतर लोकप्रतिनिधींना असतात ते सर्व अधिकार मिळत असतात.

देशात सर्वच राज्यांमध्ये विधानसभा आहेत आणि काही मोजक्याच राज्यांमध्ये विधानपरिषदाही अस्तित्वात आलेल्या आहेत. त्यात महाराष्ट्रही एक आहे. महाराष्ट्रात स्थापनेपासूनच विधान परिषद अस्तित्वात आहे. महाराष्ट्राचे गठन होण्यापूर्वी महाराष्ट्रात जुना मुंबई प्रांत आणि सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार या राज्यातील भाग जोडण्यात आले होते. त्या दोन्ही राज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात होती. त्यामुळेच महाराष्ट्रातही विधानपरिषद गठीत करण्यात आली असावी असा निष्कर्ष काढता येतो.

महाराष्ट्राच्या गठनापासूनचा इतिहास तपासला तर, महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १२ सदस्य नामनिर्देशित केले जातात. १९६० पासून तर जून २०१४ पर्यंत या विधान परिषदेत एकूण ११८ सदस्य नामनिर्देशित करण्यात आले. त्यातील १२ सदस्य वगळता बहुतेक सर्व सदस्य हे घटनेत नमूद केलेल्या निकषांमध्ये बसणारे नव्हते. तर केवळ राजकीय तडजोड म्हणून राजकीय व्यक्तींचीच नियुक्ती सदस्य म्हणून करण्यात आली होती असे आढळून आले. त्यातही सत्ताधारी पक्षाचे जे कार्यकर्ते निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज आहेत किंवा ज्यांना उमेदवारी मिळाली पण ते पराभूत झाले आणि पक्षाच्या दृष्टीने ते विधिमंडळाच्या कोणत्यातरी सभागृहात राहणे गरजेचे आहे अशाच व्यक्तींना ओढून ताणून घटनेतील निकषांमध्ये बसवून नियुक्त करण्यात आले होते. घटनेत दिलेल्या मी कशामध्ये बसणाऱ्या बारा व्यक्तींपैकी काही प्रमुख नावे गीतकार ग दि माडगूळकर, संगीतकार वसंत देसाई, साहित्यिक सरोजिनी बाबर, शिक्षण तज्ञ डॉ रमिक झकेरिया, पत्रकार मा.गो. वैद्य, लेखक अनंत गाडगीळ, सामाजिक कार्यकर्त्या निर्मला ठोकळ, कवी शांतारा' नांदगावकर, साहित्यिक लक्ष्मण गायकवाड,अशी सांगता येतील.

हे बघता १९६० पासून तर २०१४ पर्यंत महाराष्ट्रातील काँग्रेस किंवा शिवसेना, भाजप सरकारने घटनेची पायमल्लीच केली आहे असे दिसून येते. २०१४ मध्ये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची मुदत जून २०२० मध्ये संपली. त्यावेळी सत्तेत असलेल्या शिवसेना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महाविकास आघाडी सरकारने नोव्हेंबर २०२० मध्ये जी १२ नावे पाठवली तीदेखील, सर्व राजकीय नावेच असल्याचे बोलले गेले. राज्यमंत्री राज्यामध्ये सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी राज्यपाल हे केंद्रात सत्तारूढ असलेल्या सरकारने नेमलेले असतात. हे राज्यपाल केंद्र सरकार आणि राष्ट्रपतींना उत्तरदायी असतात. प्रथा परंपरेनुसार राज्यपालांनी नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची नावे निवडून राज्य मंत्रिमंडळ राज्यपालांकडे शिफारस करते आणि ती नावे घटनेच्या चौकटीत बसणारी आहेत का हे तपासून राज्यपाल त्यांची नियुक्ती करतात. जिथे केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असते तिथे राजकीय तडजोडीतून पाठविलेली नावेही मंजूर केली जातात. मात्र राज्यात वेगळ्या पक्षाचे सरकार आणि केंद्रात वेगळ्या पक्षाचे सरकार असले तर तिथे राज्यपाल हमखास घटनेच्या चौकटीत बसणारी नसलेली नावे अडवू शकतात. नोव्हेंबर २०२० मध्ये महाराष्ट्रात नेमके तेच झाले. केंद्रात भाजपाचे सरकार असल्यामुळे महाराष्ट्रातील राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांनी तब्बल २ वर्ष राज्य सरकारने पाठविलेल्या १२ नावाचा प्रस्ताव प्रलंबित ठेवला. मिळालेल्या माहितीनुसार या १२ नावांमध्ये सर्व नावे राजकीय तडजोडीतून पाठविलेली होती. परिणामी ती नावे घटनेच्या चौकटीत बसणारी नव्हती. बहुदा याच कारणासाठी राज्यपाल कोशियारी यांनी हा प्रस्ताव प्रलंबित ठेवला असावा. जुलै २०२२ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर झाले. शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांचे संयुक्त सरकार सत्तारूढ झाले. त्यावेळी राज्यपालांनी नोव्हेंबर २०२० मध्ये महाआघाडी सरकारने पाठविलेला १२ नावांचा प्रस्ताव सप्टेंबर २०२२ मध्ये परत पाठवून दिला.

त्यानंतर ऑक्टोबर २०२४ पर्यंत विधान परिषदेतील या १२ जागा रिक्तच होत्या १४ऑक्टोबर २०२२ रोजी विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होणार होती. त्यादिवशी घाईगडबडीत शिंदे फडणवीस सरकारने १२ पैकी ७ जागांवर नामनिर्देशित सदस्यांची नावे पाठवली. राज्यपाल राधाकृष्णन साहेबांनी घाईगडबडीत ती नावे मंजूर केली आणि लगेचच या ७ ही सदस्यांचा शपथविधी त्याच दिवशी उरकण्यात आला. त्यानंतर तासाभरातच आचारसंहिता लागू झाली. या ७ नावांमध्ये २ नावे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाशी संबंधित २ नावे शिवसेना शिंदे गटाशी संबंधित तर ३ नावे भारतीय जनता पक्षाशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे. यात चित्रा वाघ, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, विक्रांत पाटील, धर्मगुरू बाबु सिंग महाराज राठोड, हेमंत पाटील आणि डॉ मनिषा कायदे यांचा समावेश आहे.ही ७ ही नावे घटनेच्या कलम १७१/५ मध्ये दिलेल्या निकषांमध्ये बसणारी नाहीत असा सकृतदर्शनी निष्कर्ष काढता येतो. हे बघता तेव्हाच्या शिंदे–फडणवीस सरकारनेही घटनेची पायमल्लीच केली हे स्पष्ट दिसते आहे.

विधान परिषद किंवा राज्यसभेत नामनिर्देशित सदस्य म्हणून नावाची शिफारस करण्यासाठी सत्ताधारी राजकीय पक्षात मोठ्या आर्थिक रकमांची देवाण–घेवाण होते असे बोलले जाते. नोव्हेंबर २०२० मध्ये महाविकास आघाडीतील ३ पक्षांनी प्रत्येकी ४–४ नावे पाठवली होती. त्यावेळी काँग्रेस पक्षातील नेत्यांनी नावांची शिफारस करतांना संबंधित सदस्यांकडून प्रत्येकी ५ कोटी रुपये घेतल्याची तक्रार सेवा दलातील एका कार्यकर्त्याने राज्यपाल कोशियारी यांच्याकडे लेखी स्वरूपात केली होती. तसेच त्या कार्यकर्त्याने प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना देखील हा आरोप केला होता. त्याचा व्हिडिओ सर्व प्रसार माध्यमांवर समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला होता.

या प्रकरणांमध्ये वेळोवेळी उच्च न्यायालयामध्ये या नियुक्त्यांना आव्हान देणाऱ्या याचीकाही दाखल झाल्या. मात्र राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी केलेल्या नियुक्त्यांना सर्वसाधारणपणे न्यायालयात आव्हान देता येत नाही. परिणामी या याचिका फेटाळल्या तरी गेल्या, किंवा प्रलंबित तरी राहिल्या.

ज्याप्रमाणे महाराष्ट्रात काँग्रेसच्या राज्यात विधान परिषदेतील नियुक्त्या करताना घटनेतील तत्त्वांना हरताळच फासला गेला होता, त्याचप्रमाणे राज्यसभेतदेखील या नियुक्त्या करताना घटनेतील तत्त्वांना हरताळच फासला गेला असे दिसून येते. मात्र १९९८ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यावर त्यांनी काही नियुक्त्यांमध्ये घटनेतील तत्वे पाळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. २०१४ नंतर सत्तेत आलेल्या मोदी सरकारनेदेखील ही तत्वे प्रमाण मानूनच बऱ्याचशा नियुक्त्या केल्याचे आढळून आले आहे. हेच धोरण फडणवीस यांनीही अवलंबावे अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे.

आता महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजप शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे महायुती सरकार सत्तारूढ झाले आहे. आधी विधानसभा निवडणुका तोंडावर होत्या त्यामुळे घाई गडबडीत ७ राजकीय व्यक्तींना नियुक्ती देण्यात आली हे मान्य करता येईल. मात्र आता सत्तेत आलेल्या फडणवीस शिंदे पवार सरकारने तरी उर्वरित ५ नावे ही गैरजकीय व्यक्तींना त्यातही कला साहित्य विज्ञान या क्षेत्रातील तज्ञ आणि जाणकार ...पृष्ठ क्र. १५ वर व्यक्तींनाच निवडून त्यातील योग्य व्यक्तींना ही संधी द्यावी

दादरच्या शिवतीर्थावरच्या 'दिपोत्सवा'चा, डोळ्याचं पारणं फेडणारा लखलखाट पाहिला...आणि, सहजच मनात आलं,

अशा बाहेरच्या कृत्रिम लखलखाटाने अवघ्या जगण्याचा 'कोंडमारा' झालेल्या मराठी-घरांमध्ये...'दीप जवळी घेता पाही, अवघा प्रकाश त्याच्या ठायी', असा आनंद व सुखासमाधानाचा, अंशाने तरी 'प्रकाश' पडू शकेल काय?

...गावपाड्यांच्या व नगरं-उपनगरांच्या १०'×१०' च्या कोंडवाड्याला, या लखलखाटाचा खरोखरीच संसर्ग जडेल काय??

...तो लक्षदिपांचा लखलखाटही कदाचित; ज्यांना, आम्ही 'मुं.ठा.पु रा.ना', म्हणजे मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर...असं संबोधतो; ती, मुंबईसह महाराष्ट्रातली सगळी मोक्याची शहरं बळकावून बसलेल्या, जैन-गुजू-मारवाडी भांडवलदारवर्गाच्या पैशाच्या बळावर तर झालेला नसावा ना?

'काट्याने काटा काढता येतो' हे ठीक...पण, ज्यांनी महाराष्ट्र लुटून सामान्य मराठी-घरांमध्ये अंधार पसरवलाय, त्यांच्याच देणगीच्या पैशाने मराठी-घराघरांमध्ये 'प्रकाश' व्हायची अपेक्षा; म्हणजे, 'अंधाराकडून अंधार नाहिसा करण्याची अपेक्षा', नव्हे काय???

...थोडक्यात, हा 'दिपोत्सव', त्या थोड्याथोडक्या समृद्ध 'उच्चमध्यमवर्गीय' मराठी-घरांचं प्रतिनिधित्व करतो...जो 'स्वांत सुखाय' जगणारा आहे; तसेच, सध्याच्या रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'चा Vampire-State System 'लाभार्थी' आहे...ज्याच्या जगण्यात रोजच दिवाळी आहे व जो प्रस्थापित राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सरकारी अधिकारी किंवा कॉर्पोरेटीय-व्यवस्थापकीय क्षेत्रातला उच्चशिक्षित वर्ग म्हणून गणला गेलेला आहे...आणि, ज्याला सुकाओला दुष्काळ, नापिकी यामुळे वा 'हमीभावा'विना तडफडणाऱ्या शेतकऱ्यांच्या... अथवा कंपन्या-कारखान्यांमधून 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या दुष्टचक्रात अडकवल्या गेलेल्या अभागी जीवांच्या डोळ्यातल्या अश्रुंशी, त्यांच्या घरातल्या अंधाराशी बिलकूल देणंघेणं नाही!

अयोध्येतल्या दिपोत्सवात 'राम की पैडी' येथे ८० हजार दिव्यांनी सजवलेली रांगोळी आणि शिवतीर्थावरचा दिपोत्सवी-लखलखाट; यात तत्त्वतः कुठलाच फरक नाही...उत्तरेतल्या काय किंवा महाराष्ट्रातल्या काय, एकूणच जनसामान्यांच्या जगण्याशी फारकत घेतलेल्या या दोन्ही बाबी, धनदांडग्यांच्या उंच महालांशी मात्र, उत्तम सूत जमवून आहेत!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

**'मतचोरी'तून सत्ता बळकावणारी BJP-RSS अभद्र युती; केवळ, कष्टकरी शेतकऱ्यांचीच नव्हे; तर, देशातल्या कामगार-कर्मचारीवर्गाचीही नंबर एकची शत्रू आहे...त्यांच्याकरवी, देशात 'कंत्राटी-कामगार पद्धत' व 'काळी कामगार-संहिता'** (Black Labour-Code) **यांचा 'बुलडोझर' फिरवला जाण्यातून व समस्त कामगारवर्ग 'गुलाम गिरी व नव-अस्पृश्यते'च्या अंधारयुगात ढकलला जाण्यातून, ते क्षणोक्षणी दृग्गोचर होतयंच! एवढंच काय, आता अत्युच्चशिक्षित डॉक्टर वर्ग (विशेषतः, कॉर्पोरेट-हॉस्पिटल्समधील) व कॉर्पोरेटीय तंत्रज्ञ वर्ग (इंजिनिअर्स) देखील, त्याखाली भरडले जायला लागलाय.**

तेव्हा, बिहार-निवडणुकीत 'महागठबंधन-सेनापती' तेजस्वी यादव, यांनी जरी निवडून आल्यानंतर 'कंत्राटी-कर्मचाऱ्यां'ना नोकरीत कायम करण्याची घोषणा केली असली; तरी, त्या घोषणेचं स्वागत करताना आपल्याला खूपच तारतम्य बाळगावं लागेल....

बिहारमध्ये उद्योगधंदे फारसे नाहीतच...याचाच अर्थ, जनतेनं दिलेल्या विविध करांतून पोसले जाणाऱ्या 'सरकारी-कर्मचाऱ्यां'पुरतीच मर्यादित असणारी, ही घोषणा असावी.

अशीच कामगारांची फसगत, दिल्ली व पंजाबमधील निवडणुकीदरम्यान 'अरविंद केजरीवाल यांच्या झ' ने केली होती. तुलनेनं सरकारी-कर्मचाऱ्यांना नोकरीत 'कायम' करणं, ही बाब अगदी किरकोळ आहे; कारण, यातून देशातल्या कामगार-कर्मचारीवर्गाचं टोकाचं शोषण-अन्याय करणाऱ्या राष्ट्रीय-बहुराष्ट्रीय कॉर्पोरेट्सना कुठलंही आव्हान दिलं जात नाही...'कायम' करण्यासाठी जे काही अंशदान केलं जातं; ते जनतेच्या पैशातून...भांडवलदारांच्या तिजोर्यांतून नव्हे! कारण, त्यांच्याच मोठमोठ्या देणग्यांतून निवडणुका लढवल्या जातात व राजकीय पक्ष चालवले जातात!

**...म्हणूनच, 'राष्ट्रीय-संपत्ती' निर्माण करणाऱ्या कामगारांविषयी खरोखरीच आस्था असेल; तर, त्यांचे माणुसपणाचे रास्त हक्क व संपत्ती-निर्मितीतला त्यांचा न्याय्य वाटा मिळवून देण्यासाठी... सार्वजनिक क्षेत्रासह 'खाजगी उद्योग व सेवा क्षेत्रा'तील 'कंत्राटी-कामगार पद्धत' व 'काळी कामगार-संहिता'** (Black Labour-Code) **सत्तेवर येताच रद्द करण्याची, राहुल गांधींच्या 'इंडिया आघाडी'ने घोषणा करावीच...देशभरातला तमाम कामगार-कर्मचारीवर्ग, त्यांना वर्ष-२०२९ला सत्तेचा सोपान खात्रीपूर्वक चढण्याच्या मतदान-प्रक्रियेत मोठ्याप्रमाणावर सहाय्यभूत होईलच!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

**सरकारने घटनेची पायमल्ली करणे टाळावे** ...पृष्ठ क्र. १४ वरुन

अशी जनसामान्यांची अपेक्षा आहे. फडणवीस, पवार आणि शिंदे हे तीनही नेते नरेंद्र मोदींना आदर्श कानून कारभार बघतात. त्यामुळे मोदींनी आखून दिलेल्या रस्त्यानेच त्यांनी मार्गक्रमण करणे उचित ठरेल.

या संदर्भात अमळनेर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनात अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा संदर्भ देणे संयुक्तिक वाटते. या भाषणात डॉ. शोभणे यांनी साहित्यिकांना फारशी संधी न दिल्याबद्दल खंत व्यक्त केली होती. अध्यक्षीय भाषण हा साहित्य विश्वाचा हुंकारच असतो त्यामुळे या हुंकाराची दखल तरी राज्यकर्ते घेतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

वाचकहो पटतेय का तुम्हाला हे.....? त्यासाठी आधी समजून तर घ्या राजेहो....!

***....अविनाश पाठक***

---

# विद्याधर दाते यांचा मूळ इंग्रजी लेख मराठीत केला आहे

हे आपण आजवर पाहिलेल्यातील सर्वात बीभत्स, घृणास्पद प्रसंगचित्र आहे आणि आज भारतीय समाज कोणत्या पातळीवर पोहोचला आहे, याचे बटबटीत उदाहरण आहे. लालबागच्या गणपतीच्या विसर्जनावेळी श्री. अनंत अंबानींच्या आगमनाचा तो प्रसंग होता. गणपती ही देवता प्रतीक आहे असे मान्य केले तर, आजच्या या धनाढ्य वर्गाने त्या प्रतीकात दडलेले सर्व भलेपण उध्वस्त केले आहे.

**प्रचंड संख्येने सुरक्षा रक्षक, तेही बंदुका घेऊन उद्योगविश्वातील या धोंड व्यक्तीला चौपाटीवरुन मफतलाल तरणतलावाकडे घेऊन गेले. जिथे साध्यासुध्या लोकांना प्रवेश नव्हता. हे सगळं एखाद्या व्हीव्हीआयपीच्या सुरक्षेसारखंच होतं. बंदुका नसलेले काहीजण हातात हात घेऊन त्यांच्या भोवती मानवी साखळी करुन उभे होते.**

**लालबागचा गणपती, जसं सिद्धिविनायक मंदिराच्या बाबतीत झालं, त्याचप्रमाणे कॉर्पोरेटाईज् झाला. वर्षानुवर्षे याचं हेतुपूर्वक नियोजन करण्यात आलं आणि तो वाढत गेला. यंदा तो अंबानी कुटुंबाने पूर्णपणे ताब्यात घेतल्याने, लोकांत काहीसा संताप उसळला. गणपती हा प्राचीन भारतातील लोकशाहीचं प्रतीक होता. गण म्हणजेच गणराज्य, जिथे निवडणुका होत. आता त्याचं खासगीकरण झालं आहे. लोकमान्य टिळकांनी हा उत्सव म्हणे सत्तेविरुद्ध प्रतिकाराचं साधन म्हणून सुरु केला होता, त्याची आता थट्टा चालली आहे. सारेच विडंबन, विटंबनाही.**

हा कलांचा उत्सवही होता. संगीत, नाट्य, नृत्य, असंख्य कलाकार इथे उमलले होते. पण, आपण ते विसरलो. दशके उलटली.

आज राजकारणी आणि अनेक समाजकंटक घटकांनी हा उत्सव बळकावून, त्याला अशा भयानक कोलाहलात बदललं आहे की, अनेक श्रद्धावान हिंदू त्रस्त होतात. कुठेही पळून जाण्याची जागा नाही, अनेक दिवस हे अत्याचार सहन करावे लागतात.

**...आणि आता तर, अंबानी आणि मोदी यांच्याशिवाय काहीच घडू शकत नाही. श्रीमंत हेच आता खरे सत्ताधारी झाले आहेत. हे बऱ्याच वर्षांपासून डोळ्यांसमोर येत होतं. टाइम्स ऑफ इंडिया मध्ये काम करताना, माझ्यासारख्यांना याची जाणीव झाली होती. त्यावेळीच समीर जैन यांनी उघडपणे जाहीर केलं होतं की, आमच्यासारखे लोक हेच आता नवे राज्य, नवी सत्ता आहेत सरकार नव्हे.**

**संपादक गिरीलाल जैन यांनीही हेच ध्वनित केलं होतं. पत्रकारिता ढासळायची ती सुरुवात होती.**

नुकतेच कोलकात्याच्या टेलिग्राफचे माजी संपादक, अत्यंत आदरणीय संकर्षण ठाकुर यांचे निधन झाले आणि त्यांच्या स्मरणार्थ असंख्य लेख प्रकाशित झाले. पण, टाइम्स ऑफ इंडियाने त्यांच्या जाण्याबद्दल एक शब्दही छापला नाही, हे ज्येष्ठ पत्रकार अनिल सिंग यांनी अधोरेखित केले आहे

*अनुवाद : मुग्धा धनंजय*




भारताचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर, सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात, मनुवादी विचारसरणीच्या वकिलाकडून झालेल्या बूटफेकीच्या भ्याड हल्ल्याचा प्रयत्न केल्याच्या निषेधार्थ, ठाणे शहरातील कोर्टनाका परिसरातील, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ, 'संविधानप्रिय समता-मूलक समाज' आणि आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्त्यांकडून गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर-२०२५ रोजी, आंदोलन पुकारण्यात आले होते. या निषेध आंदोलनात 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित, पक्षाचे प्रवक्ते तथा 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे प्रसिद्धीप्रमुख श्री. संजय दळवी आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मनुवादी मानसिकता तसेच, जातीयवादी कृत्ये करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या, प्रस्थापित ब्राह्मणी व राजकीय व्यवस्थेचा जाहीर निषेध करण्यात आला. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, यांसारख्या जात्यंध आणि धर्मांध शक्तींविरोधात, देशातील बहुजन समाजाने एकत्र येऊन प्राणपणाने लढा दिल्याशिवाय, अशा प्रवृत्ती नष्ट होणार नाहीत. त्यासाठी, सामाजिक-राजकीय-जातीय मतभेद विसरुन, लोकशाही व सनदशीरमार्गानेच संविधानाचे रक्षण करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे! असे विधान 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित यांनी, प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना केले. दरम्यान, याप्रसंगी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते व ऐक्यवादी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब इंदिसे, श्री. जितेंद्रकुमार इंदिसे, श्री. भैय्यासाहेब इंदिसे, श्री. संदीप खांबे, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. संजय मं.गो., श्री. पंढरीनाथ गायकवाड, श्री. भास्कर वाघमारे, श्री. प्रमोद इंगळे, श्री. संजय भालेराव आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

---

***जानिब-ए-मंजिल मगर...***
***लोग साथ आते गये,***
***और कारवाँ बनता गया....***

...मजरुह सुलतानपुरी (एक महान 'विद्रोही' गीतकार)

(या मूळ प्रचंड गाजलेल्या शेरामध्ये मजरुहने 'लोग'च्या ऐवजी गैर शब्द वापरला होता...पण, मैफिलीत एका नवतरुण प्रतिभावान कवीने रास्त आक्षेप घेतल्यानंतर काहीसा तिरसट स्वभावाचा असूनही मजरुहने मनाचा मोठेपणा दाखवून 'गैर' शब्द बदलून 'लोग' शब्द वापरल्याचा किस्सा स्मरतो)

....या खास मजरुह-धाटणीच्या शेरोशायरीची अंगभूत ताकद एवढी मोठी की, मैं अकेला ही चला था.... हा प्रारंभ क्षणभर वगळून सुद्धा त्याचं 'मर्म', यःकिंचितही कमी न होता, तेवढीच ताकद राखत आपल्यासमोर प्रस्फुटीत होत जातं...असं शायरीत फार क्वचित घडतं, हेच मजरुह सुलतानपुरी नावाच्या कवीच्या अंतःप्रेरणेचं सामर्थ्य... जे आपल्याला केशवसुत, बालकवी, मंगेश पाडगावकर, महानोर, ग्रेस, सुरेश भट आणि अर्थातच महाकवी वि. वा. शिरवाडकरांची वगैरे तीव्रतेनं आठवण करुन देतं!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

ज्या व्यक्तीच्या काळात खिशात हजार रुपयांची मोठी नोट असली की, खूप पैसा खिशात आहे असं वाटायचं; कारण, हजार रुपयाला त्यावेळी खूप किंमत असायची.एखाद्या हॉटेलमधे गेलात आणि चहा पिलात आणि बिल देताना १००० रुपयाची नोट काढली की समोरचा हॉटेल मालक चक्रावून जायचा, ही किंमत त्या हजार रुपयांच्या नोटेत होती. आज आपल्या खिशात ५०० च्या दहा नोटा जरी असल्या तरी आपल्याला ते पैसे कमी वाटतात. कारण, सकाळी असलेल्या त्या नोटा सध्याकाळपर्यंत टिकत नाहीत, एवढी महागाई ११ वर्षात मोदींनी वाढवली आहे. देशात स्थिरता कशी टिकली पाहिजे याचा अभ्यास डॉ. मनमोहन सिंघ यांना पुरेपूर होता. म्हणून, मनमोहन सिंगसारखा महान अर्थतज्ञ देशाने गमावला या महान व्यक्तीला भावपूर्ण श्रद्धांजली.



ते कधी जास्त बोलत नव्हते, जे बोलत होते मोजकेच बोलत होते. कधी बडेजाव केला नाही, ना मोदीसारख्या बड्याबड्या बाता मारल्या नाहीत. ते कधी जास्त बोलले नाही; पण, त्यांनी नेहमी देशासाठी कार्य केलं.

**सलाम मनमोहन सिंघ साहेब.**

---

कोणा अजय बोसने माहितीच्या अधिकारात प्रश्न विचारला होता की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या दौऱ्यावर फर्स्ट लेडी जिल बायडेन यांना भेटस्वरूप दिलेल्या हिऱ्याची किंमत किती होती?

त्यावर 'द्विपक्षीय संबंध खराब होतील या कारणाने ही माहिती देऊ शकत नाही,' असे उत्तर केंद्र सरकारने दिले होते.

आता जो बायडेन यांचा कार्यकाळ संपत आला असताना त्यांना अध्यक्षपदावर असताना मिळालेल्या भेटवस्तूंची यादी आणि त्यांची किंमत जाहीर केली आहे. त्यानुसार मोदींनी बायडेन यांना दिलेल्या हिऱ्याची किंमत तब्बल २०,००० डॉलर्स इतकी असल्याचे सांगितले आहे. विशेष म्हणजे कोणत्याही परदेशी पाहुण्याने अमेरिकेच्या फर्स्ट लेडीला दिलेली ही सर्वात महागडी भेटवस्तू आहे.

सर्वसाधारणपणे आत्तापर्यंत, म्हणजे मोदी पंतप्रधान होईपर्यंत, पूर्वीचे पंतप्रधान परदेशी भेटवस्तू देताना, त्यामध्ये भारतीय संस्कृती दिसेल अशा वस्तू, पुस्तकं, हस्तकलेच्या वस्तू इत्यादी वस्तूंची निवड करत असत.

मोदींचे शौकच निराळे आहेत. पूर्वजांनी कमवायचं आणि दिवट्याने उधळायचं असा यांचा प्रकार आहे.




'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची युनियन असलेल्या, 'वालमेट फ्लो-कंट्रोल प्रा. लि.' या कंपनीतील, डोंबिवली आणि अंबरनाथ या युनिटमधील कामगार सभासदांनी, दसरा व विजयादशमीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, सर्व कामगार सभासद तसेच, कंपनी व्यवस्थापनास दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री सत्यनारायणाच्या पूजेचे मा. राजन राजे यांनी, मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान, 'वालमेट फ्लो-कंट्रोल प्रा. लि.' या कंपनीच्या व्यवस्थापनाच्या वतीने, मा. राजन राजे यांचे शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर व सचिव श्री. समीर चव्हाण उपस्थित होते.

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**